# उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर, जि. ठाणे.

# अंतर्गत लेखा परिक्षण अहवाल

## सन २०१३-१४ ते २०१६-१७

# अनुक्रमणिका


| अ.क्र | विभागाचे नाव | आक्षेप क्रमांक | पान. नं |
|---|---|---|---|
| ०१ | सामान्य प्रशासन विभाग | ०१—०२ | ०५ |
| ०२ | माहिती तंत्रज्ञान विभाग | ०३—०४ | ०७ |
| ०३ | शिक्षण मंडळ | ०५—०६ | ११ |
| ०४ | अनधिकृत बांधकाम विभाग | ०७—०९ | १४ |
| ०५ | मालमत्ता विभाग | १०—१६ | १८ |
| ०६ | अग्निशमन विभाग | १७—१९ | २९ |
| ०७ | लेखा विभाग | २० | ३४ |
| ०८ | वाहन विभाग | २१—२५ | ३६ |
| ०९ | जवाहरलाल शहरी नागरी योजना (पा.पु.) | २६ | ४६ |
| १० | स्थानिक निधी संस्था कर विभाग | २७—२८ | ४८ |
| ११ | विधी विभाग | २९ | ५१ |
| १२ | नगर सचिव विभाग | ३० | ५२ |
| १३ | दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान योजना विभाग | ३१—३६ | ५३ |
| १४ | प्रभाग समिती | ३७—४० | ६६ |
| १५ | सार्वजनिक आरोग्य विभाग | ४१ | ७० |
| १६ | सार्वजनिक बांधकाम विभाग | ४२—४३ | ७१ |
| १७ | भांडार विभाग | ४४—४६ | ७५ |
| १८ | कर विभाग | ४७—५० | ८३ |
| १९ | नगर रचना विभाग | ५१—५९ | ८९ |
| २० | पाणीपुरवठा विभाग | ६०—६६ | १०२ |


मुख्य लेखा परिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

# घोषणापत्र

लेखा परीक्षण विभाग उल्हासनगर महानगरपालिका यामार्फत महानगरपालिकेच्या विविध विभागांचे सन २०१३—१४ ते २०१६—१७ या कालावधीचे अंतर्गत लेखा परीक्षण करण्यात आले. सदरचे लेखापरीक्षण हे केवळ संबंधीत विभागांनी उपलब्ध केलेल्या नस्ती, लेखा, दस्तऐवज यांचे आधारे करणेत आले.

# सन २०१३—१४ ते २०१६—१७ या वित्तीय वर्षाचा वार्षिक अहवाल

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण ९ चे कलम १०६ (३) नुसार प्रत्येक सरकारी वर्ष सुरू झाल्यानंतर नगरपालिका मुख्य लेखापरिक्षकाने महानगरपालिकेच्या मागील वर्षाच्या संपूर्ण लेख्यावरील आपला अहवाल स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार सन २०१३—१४ ते २०१६—१७ या वित्तीय वर्षाचा लेखा परिक्षण अहवाल मा.स्थायी समिती पुढे ठेवण्यासाठी सादर करत आहे.

## प्रस्तावना:—

उल्हासनगर महानगरपालिका २१/१०/१९९६ रोजी अस्तित्वात आली. त्यापूर्वी लेखापरिक्षण महाराष्ट्र शासनाचे संचालनालय, लेखा व कोषागारे यांचेकडील मुख्य लेखापरिक्षक, स्थानिक निधी लेखा परिक्षण नवी मुंबई या कार्यालया मार्फत केले जात होते. महानगरपालिकेच्या स्थापनेनंतर सदरचे लेखा परिक्षण महानगरपालिकेचे मुख्य लेखा परिक्षकामार्फत होत आहे. त्यानुसार जमा रकमांचे लेखापरिक्षण व खर्चाचे पूर्व लेखा परिक्षण केले जात आहे. पूर्व लेखा परिक्षणामुळे काम सुरू होण्यापूर्वीच अनियमितता निदर्शनास आल्यास त्यावर नियंत्रण ठेवता येते व पालिकेच्या निधीचा संभाव्य गैरवापर थांबवता येतो.

उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये मुख्य लेखा परिक्षक,उप—मुख्य लेखा परिक्षक, सहा. मुख्य लेखा परिक्षक, तसेच १ वरिष्ठ लेखा परिक्षक आणि ३ लिपीक असा कर्मचारी वर्ग देण्यात आला आहे. त्यामधील ०१ लिपिक हे सतत तहसिलदार यांच्या कार्यालयात बी.ल.ओ. चे काम (मतदार यादयांचे पर्नुर्विलोकन करणे) करीत असतो. ०१ लिपिक संगणक ऑपरेटरचे काम करतात व ०१ लिपिक आवक—जावकाचे कामकाज करतात. यामुळे लेखापरिक्षणाचे काम निर्धारीत वेळेत करता आले नाही. सामान्य प्रशासनाकडे वेळोवेळी लेखी स्वरूपात अनुभवी कर्मचाऱ्यांची नेमणूक करणेस कळवूनही पुरेसा कर्मचारी वर्ग देण्यात आलेला नाही. याबाबींचा परिणाम लेखापरिक्षणावर झालेला आहे. व त्यामुळे लेखापरिक्षण अहवाल विलंबाने सादर होत आहे.

प्राथमिक लेखापरिक्षणाच्या दृष्टीकोणातून कार्यालयीन कामकाजामध्ये व

सुरळीतपणा, नियमितपणा तसेच मनपाच्या पैशाचा अपहार व गैरव्यवहार, गैरवापर टाळणे या उददेशाने अंतर्गत लेखापरिक्षणात आढळून आलेल्या आक्षेपांचे बाबतीत संबंधित विभाग प्रमुखांनी दखल घेवून योग्य ती कार्यवाही त्वरित करून अनुपालन सादर करणे आवश्यक आहे.

**परिशिष्ट क्र.(१) स्थानिक निधी लेखा कार्यालयाच्या सन २०१४—१५ अखेर प्रलंबित लेखा परिक्षण परिच्छेदाची अदयावत माहिती.**

| आरंभिचे एकुण परिच्छेद | एकुण वगळण्यात आलेले परिच्छेद | शिल्लक परिच्छेद |
|---|---|---|
| ४७५ | ०८ | ४६७ |

**परिशिष्ट क्र.(२) केंद्र सरकारच्या महालेखा परिक्षक कार्यालयाच्या लेखापरिक्षण अहवालाबाबत.**

महालेखापाल मुंबई यांचेकडून आपल्या महानगरपालिकेचे लेखापरिक्षण दर ०३ वर्षांनी होत आहे.

| आरंभिची शिल्लक सन २०१६—१७ पर्यंत | महालेखापरिक्षक कार्यालयाने काढलेल्या परिच्छेदांची संख्या | निरिक्षण अहवालाची संख्या | अनुपालन मान्यतेनंतर वगळण्यात आलेल्या परिच्छेदांची संख्या | शिल्लक |
|---|---|---|---|---|
| १९९ | ०७ | १९२ | — | १९२ |

स्थानिक निधी लेखा परिक्षा कार्यालय, कोकणभवन व महालेखापाल, मुंबई कार्यालयाच्या लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेदांचे अनुपालन करण्याबाबत संबंधित विभागाला कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार काही विभागांनी अनुपालन सादर कलेले आहे. सदर अनुपालन स्थानिक निधी लेखा परिक्षा कार्यालय, कोकणभवन व महालेखापाल यांनी अदयाप मान्य कलेले नाही, त्यामुळे वरिल प्रमाणे परिच्छेद प्रलंबित आहेत.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

# सामान्य प्रशासन विभाग

(परिच्छेद क्र.०१)

**सामान्य प्रशासन विभागाचे सन २०१३–१४ ते सन १६–१७ पर्यंतचे लेखापरिक्षण केले असता खालील अनियमितता दिसून आली**

**विषयः– महानगरपालिकेतील मंजूर स्थायी व अस्थायी पदांची माहिती मिळणे बाबत.**

सामान्य प्रशासन विभागाचे सन २०१३–२०१७ या वित्तीय वर्षाचे लेखा परिक्षण स्थानिक निधी लेखा संचालनालया मार्फत सुरू करण्यात आले. लेखापरिक्षणाकरिता खालील माहिती तात्काळ उपलब्ध करून देण्यात आली नाही त्यामुळे लेखापरिक्षण करण्यात आले नाही.

१) महानगरपालिकेतील एकूण मंजूर पदे व त्यांची संख्या.

२) महानगरपालिकेतील एकूण मंजूर स्थायी व अस्थायी पदे व त्यांची संख्या.

३) महानगरपालिकेत शासनाकडून प्रतिनियुक्तीवर आलेली पदे व त्यांची संख्या.

४) महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता नियम–१२३ अन्वये पदाबददलची नोंदवही (स्केल रजिस्टर) नमुना क्र.९२ मधील.

५) कर्मचारी यांचे आयकर कपातीबाबत नमुना क्र.२४ मध्ये भरलेले आयकर विवरणपत्र.

६) महाराष्ट्र शासनाने ६ वा वेतन आयोगानुसार मंजूर केलेली महानगरपालिकेतील पदांची वेतन श्रेणी.

# सामान्य प्रशासन विभाग

(परिच्छेद क्र.०२)

**सामान्य प्रशासन विभागाचे सन २०१३–१४ ते सन १६–१७ पर्यंतचे लेखापरिक्षण केले असता खालील अनियमितता दिसून आली**

**विषय:–सन २०१३–२०१७ या वर्षातील रजा व प्रवासभत्याबाबत.**

सामान्य प्रशासन विभागातील सेवा पुस्तक यांचे लेखा परिक्षण करणे बाबत रजा प्रवासभत्या बाबत महासभा/स्थायी समिती ठरावी प्रत लेखापरिक्षणास प्राप्त न झाल्याने रजा प्रवासभत्ता प्रदानाबाबत अटी व शर्ती इ.बाबत तपासणी करता आल्या नाही.

मुख्य लेखा परिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

# सामान्य प्रशासन विभाग

(परिच्छेद क्र.०२)

**सामान्य प्रशासन विभागाचे सन २०१३—१४ ते सन १६—१७ पर्यंतचे लेखापरिक्षण केले असता खालील अनियमितता दिसून आली**

**विषयः—सन २०१३—२०१७ या वर्षातील रजा व प्रवासभत्याबाबत.**

सामान्य प्रशासन विभागातील सेवा पुस्तक यांचे लेखा परिक्षण करणे बाबत रजा प्रवासभत्या बाबत महासभा/स्थायी समिती ठरावी प्रत लेखापरिक्षणास प्राप्त न झाल्याने रजा प्रवासभत्ता प्रदानाबाबत अटी व शर्ती इ.बाबत तपासणी करता आल्या नाही.

**मुख्य लेखा परिक्षक**
**उल्हासनगर महानगरपालिका**

# माहिती व तंत्रज्ञान विभाग

(परिच्छेद क्र.०३)

**नागरिक सुविधा केंद्र विभागाचे सन २०१३–१४ ते २०१६–१७पर्यंतचे लेखापरिक्षण सुरू केले असता खालील अनियमितता दिसून येते.**

१) नागरिक सुविधा केंद्र विभागात जन्म–मृत्यु नोंद फि रक्कम वसूल करण्यासाठी पावती पुस्तक भांडार विभागातून मागविली जातात. पावती पुस्तक वापर करण्यापूर्वी पावती पुस्तक किती मागविली याबाबतची नोंद ठेवणे आवश्यक आहे. नागरिक सुविधा केंद्र विभागाने पावती पुस्तक तयार केलेले नाही. पावती पुस्तक रजिस्टर बनविण्यात आलेले नाही.

२) नागरिक सुविधा केंद्र विभागातील पावती पुस्तक साठा नोंदवही लेखापरिक्षणाकरीता उपलब्ध न झाल्याने किती पावती पुस्तक भांडार विभागाकडून प्राप्त झाली? किती पावती पुस्तक वापर करण्यात आला? व किती पावती पुस्तक शिल्लक आहेत? याबाबत पडताळणी करण्यात आली नाही.

३) कॅश बुकला पान क्रमांक दिलेले नाहीत तसेच सक्षम अधिकारी यांचेकडून प्रमाणित करून घेतलेले नाही. पावती पुस्तक प्रमाणित केलेली नाही.

**अ)** नागरिक सुविधा केंद्र विभागाने अदयावत पावती पुस्तक साठा नोंदवही तयार केलेले नाही.

**ब)** कॅश बुक पूर्ण नंबरींग केलेले नाही. तसेच प्रमाणित केल्याचे दिसून येत नाही.

४) महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियमानुसार २ लाख रूपयांपेक्षा कमी रकमेच्या कोणत्याही निविदेची सुचना महानगरपालिकेच्या अधिकृत संकेत स्थळावर दर्शविण्यात येउन खरेदी करण्यात यावे असे निर्देशित केले आहे. तथापि नागरिक सुविधा केंद्र या विभागाने याबाबतीत काटेकोरपणे अंमलबजावणी केली नसल्याचे निदर्शनास आली आहे.

५) उल्हासनगर महानगरपालिका नागरिक सुविधा केंद्र यांनी सदरील साहित्य खरेदी करण्यासाठी वित्तीय नियमांचे अवलंब केलेले दिसून आलेले नाही.

६) महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियमावली वित्तीय प्रकाशन—क्र.९ नियम क्र.९५ नुसार नागरिक सुविधा केंद्र विभागात जड वस्तु संग्रह नोंदवही ठेवणे आवश्यक आहे त्यामध्ये जड वस्तूंची नोंद घेणे आवश्यक आहे. परंतु तशा प्रकारची कार्यवाही आहे परंतु तशा प्रकारची कार्यवाही होत नसल्याचे आढळुन आलेले आहे.

तरी वरिल आक्षेपांची पुर्तता करून पुर्तता अहवाल त्वरीत लेखापरिक्षण विभागास सादर करावा.

# माहिती व तंत्रज्ञान विभाग

(परिच्छेद क्र. ०४)

**माहिती व तंत्रज्ञान विभागाचे सन २०१३–१४ ते सन १६–१७ पर्यंतचे लेखापरिक्षण केले असता खालील अनियमितता दिसून आली**

**विषय:–उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये इ–गर्व्हन्स प्रकल्पा अंतर्गत SMART या संकल्पनेच्या कामात अनियमितता झालेबाबत.**

उल्हासनगर महानगरपालिका प्रशासन गतिमान व लोकाभिमुख होउन प्रशासकीय कामकाजात पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीने महापालिका कामकाजात माहिती तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर करून शासनास अपेक्षित असलेली SMART ( Simple,Moral , Accountable, Responsive & Transparent) संकल्पनेची अंमलबजावणी करणेबाबतचा प्रस्ताव महासभा ठराव क्र.५० दि.३१/१०/२००७ अन्वये मंजूर करण्यात आलेला आहे. त्याअनुषंगाने नागरिकांना महापालिकेतर्फे पुरविल्या जाणाऱ्या विविध सेवा प्रभाग कार्यालये व नागरिकांची जास्तीत जास्त वर्दळ असलेली ठिकाणे उदा.रेल्वे स्टेशन, गार्डन, मार्केट चौक अशा ठिकाणी उपलब्ध करून देणेबाबत तसेच बांधकाम परवानगीचे संगणक आज्ञावलीव्दारे तात्काळ पडताळणीसाठी पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिपव्दारे दहा वर्षे कालावधीसाठी प्रकल्प राबविणेबाबत निविदा मागवून न्युनतम दरपत्रधारक मे सन डिजिटल उल्हासनगर यांचेकडून कार्यादेश क्र.UMC /CFC /318 /319 /0801 /12 / 2008 KISOK Multi Utility Center व्दारे पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप मधून नागरिकांना सेवा उपलब्ध

करून देऊन तशी कर पावती, पाणी पुरवठा कर (पटटी) पावती, जन्म मृत्यू प्रमाणपत्र, इतर सेवा, ग्रहव्हनॅक्स व थकित देयके बाबतची काम, पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप व्दारे महानगरपालिकेला नागरी सेवा सुविधेव्दारे सेवा देत आहे., त्यानुसार न्यूनतम दरपत्रधारक मे,इन डिजिटल यांची मुळ निविदा नस्ती लेखा परीक्षणास उपलब्ध करून देण्यात आलेली नाहि.

**मुख्य लेखा परिक्षक**
**उल्हासनगर महानगरपालिका**

# शिक्षण विभाग

(परिच्छेद क्र. ५)

**शिक्षण विभागाचे सन २०१३–१४ ते २०१६–१७ पर्यंतचे लेखापरिक्षण सुरू केले असता खालील अनियमितता दिसून येते.**

**विषयः—मनपा शाळांमधील विदयार्थ्यांसाठी बेंच पुरवठयासाठी केलेल्या प्रदानाबाबत.**

शिक्षण मंडळाने पुरवठा दारास दिलेले बेंचेस पुरवठयाचे कार्यादेश, पुरवठा कालावधी, साठा नोंदवहया पडताळणीस उपलब्ध झाल्या नाहीत. तसेच प्रमाणकासोबत पुरवठा चलने व उपप्रमाणकांच्या मुळ प्रती उपलब्ध नसून छायांकित प्रती जोडण्यात आल्या आहेत. त्यामुळे सदर अभिलेख्यां अभावी खर्चाच्या सत्यतेची लेखापरिक्षणास खात्री करता आली नाही. खर्चाच्या प्रमाणकांवर प्रशासन अधिकारी यांचा प्रदान आदेश नोंदविण्यात आलेला नाही. वर्ष २०१०–११ मधील खर्चाचे प्रदान वर्ष २०१३–१४ मधील मंजूर अर्थसंकल्पीय अनुदानातून करण्यात आले आहे. यासाठी महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील कलम १०२ नुसार स्थायी समितीची मान्यता घेण्यात आल्याचे लेखा परिक्षणास आढळून आले नाही.

फर्निचर पुरवठा खर्चाच्या प्रमाणकावर प्रशासन अधिकारी यांची स्वाक्षरी नाही अथवा प्रदानाच्या रकमेस प्रशासन अधिकरी यांची मंजूरी घेण्यात आल्याचे लेखा परिक्षणास आढळून आले नाही

तरी वरिल आक्षेपांची पुर्तता करून पुर्तता अहवाल त्वरीत लेखापरिक्षण विभागास सादर करावा.

## शिक्षण विभाग

(परिच्छेद क्र. ६)

शिक्षण विभागाचे सन २०१३—१४ ते २०१६—१७ पर्यंतचे लेखापरिक्षण सुरू केले असता खालील अनियमितता दिसून येते.

**विषयः—मनपा शाळांमधील विदयार्थ्यांसाठी सन २०१०—११ करीता रेनकोट पुरविणे कामातील अनियमितता.**

प्राथमिक शिक्षण मंडळातील विदयार्थ्यांना रेनकोट पुरविणेबाबतच्या खर्चाच्या नस्तीचे लेखापरीक्षणाअंती पुढील अनियमितता निर्दर्शनास येते.

प्रमाणक क्र.एसबी—३ दि.२४/०४/२०१३ अन्वये रक्कम रू. ७५९६२/— इतकी रक्कम आयकर विभागात भरणेकरीता बॅकेत भरणा केली असल्याचे दिसून येते. परंतू चलनाची प्रत लेखापरीक्षणाकरीता प्राप्त न झाल्याने पडताळणी करता आली नाही.

रेनकोट पुरवठा आदेश व वितरण सन २०१०—११ मध्ये केले असतांना माहे एप्रिल २०१३ मध्ये केलेल्या प्रदानाच्या विलंबाबाबत कोणतेही कारण नस्तीत नमूद केलेले नाही. तसेच सदर रेनकोट पुरवठा केलेले प्रदान यापुर्वी केले नसलेबाबत प्रमाणपत्र प्रमाणकासोबत किंवा नस्तीत आढळून आले नाही.

करारनामा अंदाजपत्रकीय रक्कम रू. ३५०००००/— वर रक्कम रू.२६००/— मुद्रांक शुल्क असलेल्या स्टॅम्प पेपरवर करणे आवश्यक असतांना रक्कम रू.१००/—च्या मुद्रांक शुल्क असलेल्या स्टॅम्प पेपरवर केला आहे. सबब, उर्वरीत रक्कम रू.२५००/— शासन खाती जमा करणे आवश्यक आहे.

सदर बाबतीत अनियमितता झाल्याचे आढळून येते.

तरी वरिल आक्षेपांची पुर्तता करून पुर्तता अहवाल त्वरीत लेखापरिक्षण विभागास सादर करावा.

**मुख्य लेखा परिक्षक**
उल्हासनगर महानगरपालिका

# अनधिकृत बांधकाम विभाग

(परिच्छेद क्र.७)

**अनधिकृत बांधकाम विभागाचे सन २०१३–१४ चे** लेखापरिक्षण **सुरू केले असता खालील** अनियमितता **दिसून येते.**

**विषय:– अनधिकृत बांधकाम व पदपथ** विभागातील **जमा रक्कमेच्या अनुषंगाने** अनियमिततेबाबत.

उल्हासनगर महानगरपालिकेतील अनधिकृत बांधकाम व पदपथ विभागातील लेख्यांचे लेखापरीक्षण केले असता अनियमितता निदर्शनास आलेल्या आहेत.

अनधिकृत बांधकाम व पदपथ विभागातील पावती पुस्तक साठा नोंदवही लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध न झाल्याने किती पावती पुस्तके भांडार विभागाकडून घेण्यात आली? किती पावती पुस्तकांचा वापर करण्यात आला? व किती पावती पुस्तके शिल्लक आहेत? याबाबत पडताळणी करता आली नाही.

पदपथ विभागाकडून केलेल्या कार्यवाहीत जप्त केलेल्या मालाची/सामानाची नोदवही लेखापरीक्षणाकरीता प्राप्त झाली नाही.

सन २०१३–१४ कालावधीत पदपथ विभागाकडून एकूण किती रोखवही वापरात होत्या? पदपथ विभागाकडून मार्च २०१४ मध्ये एकुण रक्कम रू. १९५००/– वसूल केली असतांना अंदाजपत्रकात निरंक रक्कम दर्शविली आहे.

# अनधिकृत बांधकाम विभाग

(परिच्छेद क्र.८)

**अनधिकृत बांधकाम विभागाचे सन २०१३—१४ ते २०१६—१७ पर्यंतचे लेखापरिक्षण सुरू केले असता खालील अनियमितता दिसून येते.**

**विषय:— अतिक्रमण विभागातील अनधिकृत बांधकाम निष्कासनाच्या अनुषंगाने अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नसल्याबाबत**

सन २०१३—१४ अखेर एकूण किती अनधिकृत बांधकामे आहेत. त्याचे सर्वेक्षण कोणत्या अधिकारी व कर्मचारी यांनी केले त्यांच्या दैनंदिन अहवालासह अनधिकृत बांधकामे पाडल्याचे कागदपत्रे प्राप्त झाली नाहीत.

बांधकामे निष्कासित करणेसाठी मंजुरी मागितली व विभागाने दिलेल्या मंजुरीचे आदेश व त्यानुसार निष्कासनाबाबत केलेल्या कार्यवाहीचे पंचनामे, फोटो अभिलेख उपलब्ध झाले नाहीत.

अनधिकृत बांधकामे निष्कासित करतांना निरूपयोगी साहित्य निघाल्याची जमा नोंद ठेवली नसल्याचे दिसून आहे व लिलावाद्वारे केलेल्या विक्रीची कागदपत्रे उपलब्ध झाली नाहीत.

अनधिकृत बांधकामे निष्कासित करणेसाठी आयुक्त यांचे पत्र क्र. उमपा/अबांनिवि/अतिक्रमण/१९६/२००१दि.३०/१०/ २००१ चे आदेश आहेत. त्यामध्ये प्रति चौरस फुट रू.६३/—दर असून महानगरपालिकेच्या उत्पन्न वाढीसाठी दर सुधारीत करणे आवश्यक आहे.

उल्हासनगर मनपा क्षेत्रातील धोकादायक इमारतींची संख्या इ.बाबत अभिलेख अप्राप्त आहे.

# अनधिकृत बांधकाम विभाग

(परिच्छेद क्र.९)

**अनधिकृत बांधकाम विभागाचे सन २०१३–१४ ते २०१६–१७ पर्यंतचे लेखापरिक्षण सुरू केले असता खालील अनियमितता दिसून येते.**

**विषयः– अतिक्रमण विभागातील अनधिकृत बांधकामांच्या निष्कासना करीता महानगरपालिकेने केलेला खर्च वसूल केला नसल्याबाबत.**

महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधिल कलम २६०(२)नुसार अनधिकृत इमारतीच्या बाबतीत सदर इमारत किंवा काम काढून टाकण्यात येऊ नये. त्यात फेरफार करण्यात येऊ नये किंवा काम पाडण्यात येऊ नये याबाबत आयुक्तांची खात्री होईल अशा रीतीने कारण दाखविण्यात जर अशी व्यक्ती कसूर करीत असेल तर आयुक्तांना इमारत काढून टाकता येईल. त्यात फेरफार करता येतील किंवा ते पाडता येईल आणि त्याचा खर्च उक्त व्यक्तीने दिला पाहिजे अशी तरतूद आहे. तसेच उक्त अधिनियमाच्या कलम २६४(४) पोटकलम ३ अन्वये धोकादायक बांधकामाच्या निष्कासनाचा खर्च इमारत मालक/भोगवटादाराने दिला पाहिजे अशी तरतूद आहे. तसेच उल्हासनगर महापालिका आयुक्तांचे आदेश क्र. उमपा /अवानिवी /अतिक्रमण / १९६/ २००१ दि. ३०/१०/२००१ उल्हासनगर महापालिकेच्या अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण निर्मुलन विभागाकडून अनधिकृत बांधकाम निष्कासित करतांना होणारा खर्च १(प्रती) चौरस फूट चटई क्षेत्राचे बांधकमास रू.६३/– या प्रमाणे अनधिकृत बांधकाम

कर्त्यांकडून वसूल करण्यात यावेत असे नमूद करण्यात आले आहे.

सन २०१३—१४ वित्तीय वर्षात एकूण १४२ अनधिकृत बांधकामांचे निष्कासन महानगरपालिकेने केल्याचे निदर्शनास आले आहे. परंतु सदर अनधिकृत बांधकामांच्या मालकांकडून निष्कासनाचा खर्च वसूल झाला नसल्याची अनियमितता दिसून येते.

**मुख्य लेखा परिक्षक**
**उल्हासनगर महानगरपालिका**

# मालमत्ता विभाग

(परिच्छेद क्र. १०)

**मालमत्ता विभागाचे सन २०१३–१४ ते २०१६–१७ पर्यंतचे लेखापरिक्षण सुरू केले असता खालील अनियमितता दिसून येते.**

**विषय:— मालमत्ता विभागामार्फत महापालिकेच्या मालकीच्या असणाऱ्या मालमत्ता भाडे तत्वावर वापरण्यास देण्यात येतात. सदरची भाडयाची रक्कम वसुल करण्याचे काम मालमत्ता विभागामार्फत केले जाते.**

मालमत्ता विभागामार्फत भाडे व इतर प्रकारची रक्कम वसूल करण्यासाठी पावती पुस्तके भांडार विभागातून मागविली जातात. पावती पुस्तकांचा वापर करण्यापूर्वी पावती पुस्तके किती मागविली याबाबतची नोंद साठा रजिस्टर मध्ये ठेवणे क्रमप्राप्त आहे. परंतू मालमत्ता विभागाकडील दप्तर तपासता अशा प्रकारचे साठा रजिस्टर दि. २१.१. २०१३ पासून ठेवण्यात आल्याचे दिसते. परंतू सदर पावती पुस्तके साठा रजिस्टर तपासले असता त्यात खालील त्रृटी दिसून आल्या.

**अ)**मालमत्ता विभागाने दि. २१.१.२०१३ पासून साठा नोंदवही अदयावत केलेली नाही.

**ब)**सदरचे पावती पुस्तक कोणत्या कर्मचाऱ्यास दिले आहे याची नोंद नाही.

**क)**पावती पुस्तकात अनियमितता झाल्यास कोणत्या कर्मचाऱ्यावर जबाबदारी निश्चित करावयाची याचा बोध होत नाही.

**ड)**कॅश बुक पूर्ण नंबरींग केलेले नाही. तसेच कॅश बुक प्रमाणित केल्याचे दिसून येत नाही.

इ) रक्कम वसुली केले नंतर त्याच दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी रोखपाल यांचेकडे जमा करणे अपेक्षित असतांना दोन–तिन महिने नंतर रक्कम भरणा केलेचे दिसून आले या बाबत संबंधितावर खालील प्रकरणी कार्यवाही केल्याचे दिसत नाही.

१.पावती बुक क्र. १३६८, पावती क्र. १३६७०१ ते १३६७३८ हया पावत्यांची रक्कम दि. २९.६.२०१३ ते १५.७.२०१३ या कालावधीत वसूल केलेली दिसते व ही रक्कम दि. ७.८.२०१३ रोजी भरणा केल्याचे दिसून येते.

२. दि. १५.७.२०१३ रोजी वसूली केलेली पावती क्र. १३६७३९ ते १३६७५४ व पावती क्र. १३६७५५ ते १३६७५९ याची भरणा रक्कम दि. ११.९.२०१३ रोजी दिसून येते.

३. दि. ७.८.२०१३ रोजी वसूल केलेली पावती क्र. १३६७६० ते १३६७६८ ची रक्कम ही दि. १२.९.२०१३ रोजी प्रत्यक्ष भरणा केलेली दिसून येते.

## मालमत्ता विभाग

(परिच्छेद क्र. ११)

मालमत्ता विभागाचे सन २०१३–१४ ते २०१६–१७ पर्यंतचे लेखापरिक्षण सुरू केले असता खालील अनियमितता दिसून येते.

**विषयः— मालमत्ता विभागाचे कॅशबुक तपासले असता त्यामध्ये नमूद केलेली पावती पुस्तके उपलब्ध करून न दिलेबाबत**

मालमत्ता विभागाचे लेखापरिक्षण केले असता कॅशबुक मध्ये नोंद केलेले पावती पुस्तके उपलब्ध करून दिलेले नाही. त्यामुळे सत्यता पडताळता येत नाही.

**पावती पुस्तक उपलब्ध करून न दिलेल्याचा तपशील**

| अ. क्र. | कॅश बुक मधील तपशील कालावधी | पावती क्र. | एकुण पावती पुस्तके | वसूली रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | २७.९.२०१२ ते २९.८.२०१३ | १०६६, १३६५, १३६७ १३६७, १३७० | ०५ | |
| ०२ | १.४.२०१५ ते ३१. ३.२०१६ | १८७, ३२७, ३२९ ३३१, ३३४, ४१२ ४९९ | ०७ | |
| ०३ | १५.१२.२०१५ ते ३१.३.२०१६ | ४१५, ४१६, ४१८ ४९०, ४९८, २१, २२, २३, २४, २५, २७, २८, १०३, १०९, ११०, १६२, १६३, १६४, | १८ | |
| ०४ | ३.८.२०१६ ते पासून... | १६४, १६६, २०९, २२२ २२४,२२५,२२६,२८३, २८५,२८६,४१९,४५१, ४५३, ४५५, ४५६, ५५४ | १७ | |
| ०५ | १३.४.२०१६. ते २३.१.२०१७ | ४९९,२६,१६५,२०७,२०८२२३,२८४ | ०७ | |
| | **सदर पावती पुस्तकांची एकुण वसूली रक्कम** | | ५४ | १६४५९८१२ |

## मालमत्ता विभाग

(परिच्छेद क्र.१२)

**मालमत्ता विभागाचे सन २०१३–१४ ते २०१६–१७ पर्यंतचे** लेखापरिक्षण **सुरू केले असता खालील अनियमितता दिसून येते.**

**विषयः—वसुल केलेल्या रकमा लेखा विभागात जमा करणेबाबत आढळून आलेल्या अनियमितता**

मालमत्ता विभागामार्फत जेवढी रक्कम वसूल केली तेवढी रक्कम भरणा करणे अपेक्षित होती परंतू खालील प्रमाणे वसुल केलेली रक्कम भरणा केल्याचे दिसून येत नाही. सदरची बाब गंभीर आहे.

**कमी भरणा केलेल्याचा तपशील**

| अ.क्र. | पवती क्र | पवती नं. | वसूली रक्कम | कमी भरणा केलेली रक्कम | तफावत | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | १३६६ | १३६५६८ | ३०० | १५० | १५० | कमी भरणा केली |
| ०२ | १३६६ | १३६५८९ | ३०० | १५० | १५० | कमी भरणा केली |
| ०३ | ३३ | ००३२४२ | १८०० | १५०० | ३०० | कमी भरणा केली |
| ०४ | १६६७ | १६४६६५ते १६४७०० | ५४०० | ५२५० | १५० | कमी भरणा केली |
| | | **एकुण** | ७८०० | ७०५० | ७५० | |

# मालमत्ता विभाग

(परिच्छेद क्र. १३)

**मालमत्ता विभागाचे सन २०१३–१४ ते २०१६–१७ पर्यंतचे लेखापरिक्षण सुरू केले असता खालील अनियमितता दिसून येते.**

**विषय:– कॅश बुक मधिल नोंदीमधील अनियमिततेबाबत.**

मालमत्ता विभागातील दप्तर तपासणी केली असता खालील प्रमाणे पावती पुस्तकातील वसुल केलेली रक्कम कोणत्या कॅश बुक मध्ये नोंद केली याची नोंद दिसून येत नाही.

कॅशबुक मध्ये नोंद नसल्याचा तपशील

| अ. क्र. | पावती पु.क्र | पावती नं. | वसूली रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०५ | १६६७ | १६४६६५ ते १६४६६४ | ९३०० | वसुल केलेली रक्कम कोणत्या कॅश बुकमध्ये भरणा केली आहे याची नोंद दिसून येत नाही |
| ०६ | ३३५ | ३३४३१ | ५०० | वसुल केलेली रक्कम कोणत्या कॅश बुकमध्ये भरणा केली आहे याची नोंद दिसून येत नाही |
| ०७ | ३९ | ३८०१ ते ३८७२ | १००२१७९ | वसुल केलेली रक्कम कोणत्या कॅश बुकमध्ये भरणा केली आहे याची नोंद दिसून येत नाही |
| | | **एकुण** | १०११९७९ | |

# मालमत्ता विभाग

**(परिच्छेद क्र. १४)**

**मालमत्ता विभागाचे सन २०१३—१४ ते २०१६—१७ पर्यंतचे लेखापरिक्षण सुरू केले असता खालील अनियमितता दिसून येते.**

**विषयः— आदेश, परिपत्रक, ठराव, करारनामा इ. अन्वये काटेकोरपणे अंमलबजावणी केली असल्याबाबत ची प्रत उपलब्ध केली नसल्याबाबत.**

खालील नमुद केलेल्या रकमा कोणते आदेश, परिपत्रक, ठराव, करारनामा इ. अन्वये वसूल करण्यात आले याबाबतची प्रत लेखा परिक्षणास उपलब्ध करून दिली नाही.

**१)पावती पुस्तक क्र.२६ पावती नं. २५१७ दि. ४.५.२०१६**

अध्यक्ष/सचिव जन जागृती समाजिक संस्था, वसनशहा दरबारच्या समोर, उल्हासनगर..५ येथिल पैसे दया व वापरा तत्वावर शौचालय बांधण्यासाठीची सुरक्षा अनामत रक्कम रू.२५०००/

**२)पावती पुस्तक नं.२६ पावती नं. २५२४ दि. ६.५.२०१६**

अध्यक्ष/सचिव विकास मतिमंद विदयालय कुर्ला कॅम्प, उल्हासनगर ४ यांचेकडे समाज मंदिराचे भाडे वसूल करण्यात आले आहे. मे २०१६ ते सप्टेंबर २०१६ या कालावधितील रू. २५००/—

**३)पावती पुस्तक नं.२६ पावती नं.२५२५**

मे. लक्ष्मी ॲडव्हरटायझिंग जाहिरात फलकांचे भाडे रू.४,४८,/—

**४)पावती पुस्तक नं.२६ पावती नं.२५२६**

मे. किंग्स इंटरप्रायजेस जाहिरात फलकांचे भाडे रू.१,१८,७६०/—

**५)पावती पुस्तक नं.२६पावतीनं.२५२७**(दि.२०.४.१६ते१९.१०.१६)

मे. पवन ॲडव्हरटायझिंग दिशादर्शक फलकांचे भाडे रू.,१८,७६०/—

**६)पावती पुस्तक नं.२६ पावती नं.२५२८**

मे. पवन ॲडव्हरटायझिंग दिशादर्शक फलकांचे भाडे रू. १,५६,६२४

**७)पावती पुस्तक नं.२६ पावती नं.२५२९**

मे. पवन ॲडव्हरटायझिंग दिशादर्शक फलकांचे भाडे रू. १५,६२४

**८)पावती पुस्तक नं.२६ पावती नं.२५५६ दि.३/६/२०१६**

पास्कल सॅमटीस रोल एन. स्कोल ५०७, श्री सम्राट प्लाझा, मुलुंड(पू) वाहनावरील जाहीरात करणेसाठीची परवानगी शुल्क रू.६२७०

९)गटई कामगार यांचेकडून भाडे वसूल करण्यात येते.

१०)पी.सी.ओ. धारक यांचेकडून भाडे वसूल करण्यात येते.

**११)पावती पुस्तक नं.२६ पावती नं.२५८५ दि. २४.०८.२०१६**

राजु सोनी रामेश्वरा कॉम्प्लेक्स जवळ उ. नगर.५ यांना हॅंडलुम प्रदर्शन व आनंद मेळा कार्यक्रमासाठी भगवंती नावानी स्टेज समोरील गौल मैदान येथिल जागा भाडे रू.२१३७५०/—

**पावती नं.२५८६** रू.११२५०/—

**पावती नं.२५८७** रू.२०००/—

**१२)पावती पुस्तक नं.२०८पावती नं.२०७१०,२०७११,२०७१२**

हेलिकॉप्टर उतरविणेसाठी अनामत,सेवाकर रक्कम इ. भाडे.रू.९३७५, सेवाकर रक्कम रू. १३१३/—

**१३)पावती पुस्तक नं.२२३** उपलब्ध करून दिलेले नाही.

दि.१३.०४.२०१६ ते दि.२३.०७.२०१७ रक्कम रू. ५५३०२१

**१४)पावती पुस्तक नं.२८४ पावती नं.२८३०४**

मनु भुलचंद जोगरा यांना तात्पुरता फटाका स्टॉल करीता भगवंती नावानी स्टेज समोरील गोल मैदान येथिल जागा सेवा शुल्कसहित रू. १२५६२/—

**१५)पावती पुस्तक नं.२८४ पावती नं.२८३१४**

साधु वासवानी पुतळयाच्या उजव्या बाजुला गोल मैदान येथिल सभागृहात मनोरंजनासाठी जागा सेवा शुल्कसहित रू.३०३४३.

**१६)पावती पुस्तक नं.२८४ पावती नं. २८३२३**

भास्कर विठ्ठल वैद्य शांतीनगर पे अॅण्ड पार्किंगचे माहे. जुन २०१५ ते ऑक्टोंबर २०१६ पर्यंतचे भाडे सेवा शुल्कसहित रू.६००००

**१७)पावती पुस्तक नं.२८४ पावती नं २८३२५**

मे. पवन अॅडव्हरटायझिंग निओनसाईन ग्लोसाईलच्या फलकांचे भाडे रू. २०,९८,८०० (दि.०१.०७.१६ते ३१.१२.१६ या कालावधीतील)

**१८)पावती पुस्तक नं.२८४ पावती नं ४९८६३**

शहिद अरूणकुमार वैद्य टाऊन हॉल चे भाडे सेवा शुल्कसहित रू.३,६३,००० ( वर्ष सन २०१६ते २०१७ या कालावधीतील)

**१९)पावती पुस्तक नं.३२७ पावती नं ९२६०८**

सहा. आयुक्त दुकाने निरिक्षक कार्यालय उल्हासनगर यांना भाडे आकारणी रू.२५२४८ पैकी वसुल रू. ६३१२ केली आहे त्यामुळे रू. १८९३६ इतक्या रकमेची वसुली कमी केल्याचे निदर्शनास येते.

२०)नवरात्री उत्सवासाठी नवरात्र मंडळाकडून सरसकट रू.५०० परवानगी शुल्क आकारण्याचे निदर्शनास आले आहे. (दि.१३.१०.२०१५)

# मालमत्ता विभाग

(परिच्छेद क्र. १५)

**मालमत्ता विभागाचे सन २०१३–१४ ते २०१६–१७ पर्यंतचे लेखापरिक्षण सुरू केले असता खालील अनियमितता दिसून येते.**

**विषयः– कॅशबुकातील नोंदींमधिल अनियमिततेबाबत.**

१)पावती पुस्तक नं.४९९पावती नं.४९८६४ ... रक्कम रू. ३००००
४९८६५ ... रक्कम रू. ५००
४९८६६ ... रक्कम रू. ४२००

दि. ३१.०३.२०१६ रोजी वसुल केलेली रक्कम कोणत्या कॅश बुक मध्ये नोंद केली याचा खुलासा करण्यात यावा.

२)पावती पुस्तक नं.२४८ पावती नं. २८३८८ ... रक्कम रू. ४३३२
२८३८९ ... रक्कम रू. ११८९१
२८३९० ... रक्कम रू. ६०
२८३९१ ... रक्कम रू. ११४०१
२८३९२ ... रक्कम रू. ५००
२८३९३ ... रक्कम रू. ६०
२८३९४ ... रक्कम रू. २५००
२८३९५ ... रक्कम रू. २८००
२८३९६ ... रक्कम रू. ४०००
२८३९७ ... रक्कम रू. ६०
२८३९८ ... रक्कम रू. ६०
२८३९९ ... रक्कम रू. ५००
२८४०० ... रक्कम रू. ५००

दि.२१.०१.२०१७ रोजी वसुल केलेली रक्कम कोणत्या कॅश बुक मध्ये याची नोंद दिसून येत नाही.

३)पावती पुस्तक नं.१८७ पावती नं. १८६७० ते १८६८१ एकुण रक्कम रू. १६५० ची नोंद कोणत्या कॅश बुक मध्ये केली हे दिसून येत नाही.

४)पावती पुस्तक नं. ३३५ पावती नं. ३३४३१ रू.५०० ची भरणा सन १.४.१५ ते ३१.३.१६ या कॅश बुक मध्ये केलेली दिसते परंतु प्रत्यक्षात मात्र पावती पुस्तक उपलब्ध नाही. त्यामुळे सत्यता पडताळणी करता आली नाही.

५)पावती पुस्तक नं. ४१२, १०३, १६४, व १६६ लेखापरिक्षणास उपलब्ध करून दिले नसल्याने लेखापरिक्षण करता आले नाही.

## मालमत्ता विभाग

(परिच्छेद क्र. १६)

**मालमत्ता विभागाचे सन २०१३–१४ ते २०१६–१७ पर्यंतचे लेखापरिक्षण सुरू केले असता खालील अनियमितता दिसून येते.**

**विषय:— मालमत्ता विभागामार्फत भाडे वसूली केली असता त्याची सत्यता पडताळणे बाबत.**

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील महापालिकेच्या ताब्यातील जागा विविध कार्यक्रकमासाठी जसे की, मैदाने, उदयाने, फुटपाथ हे तात्पुरत्या कार्यक्रमासाठी भाडे तत्वावर वापरण्यासाठी देण्यात येतात त्याचे अनामत रक्कम घेऊन भाडे आकारण्यात येते. त्याचे आदेश, परिपत्रक,ठराव,महासभा/स्थायी समिती ठराव इ. लेखापरिक्षणास उपलब्ध करून दिले नाही त्यामुळे भाडे वसुलीची सत्यता पडताळता आली नाही.

उल्हासनगर महानगरपालिकेने मालमत्ता विभागाकडील मालमत्ता भाडे थकबाकी वसुलसाठी विभागाने मालमत्तेचे भाडे अथवा कर हे दोन महिनेपेक्षा जास्त कालावधीपर्यंत थकीत असल्यास अशा सर्व थकबाकीदारांना भाडे जमा करणेबाबत नोटीस देणे आवश्यक होते तशा प्रकारच्या नोटीसा दिल्याचे लेखा परीक्षणा वेळी आढळून आले नाही.

तरी वरिल आक्षेपांची पुर्तता करून पुर्तता अहवाल त्वरीत लेखापरिक्षण विभागास सादर करावा.

**मुख्य लेखा परिक्षक**
**उल्हासनगर महानगरपालिका**

# अग्निशमन विभाग

(परिच्छेद क्र. १७)

**अग्निशमन विभागाचे सन २०१३–१४ ते २०१६–१७ पर्यंतचे लेखापरिक्षण सुरू केले असता खालील अनियमितता दिसून येते.**

**विषय:—अग्निशमन विभागात अग्निशमन यंत्रणा कार्यक्षम व सुस्थितीत ठेवलेचे प्रमाणपत्र परवानाधारक सादर न होणेबाबत**

नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. अशस/१४०७/३६०७/ २११ दि. ३१/०८/२००९ मधील परिच्छेद क्र.३ अन्वये सर्व मंजूर पदे तात्काळ भरून अग्निशमन विभाग कार्यक्षम ठेवायचा आहे उल्हासनगर महानगरपालिका स्थायी समिती ठराव क्र.६५ दि. ०८/०९/२०११ अन्वये अग्निशमन विभागात एकुण ६० फायरमनच्या मंजूर पदापैकी केवळ १८ पदे कार्यरत असून एकूण ४२ पदे रिक्त आहेत.तरी अग्निशमन विभाग कार्यक्षम ठेवणेकरीता महानगरपालिकेकडून योग्य ती कार्यवाही होणे आवश्यक आहे.

उल्हासनगर मनपा महासभा ठराव क्र.२६ दि. ०९/०७/२०१२ अन्वये विविध व्यवसायाकरीता अग्निशमन दलाचा ना–हरकत दाखला घेणेरीता प्रथमवेळी रू.१०००/— व त्यानंतर पुढील प्रत्येक वर्षी नुतनीकरणाकरीता रू. ५००/— इतके शुल्क आकारणे आवश्यक आहे. उल्हासनगर मनपा क्षेत्रात एकूण किती व्यवसाय कार्यरत आहे? याबाबतची माहिती अग्निशमन विभगाकडे उपलब्ध नसल्याने तशा प्रकारची माहिती मनपाच्या किंवा शासनाच्या संबंधित विभागाकडून प्राप्त करून त्या त्या व्यवसाय मालकांकडे अग्निशमन दलाचा ना–हरकत

दाखला घणेबाबत नोटीस व तद्नंतर नुतनीकरण करण्याकरीता नोटीस पाठवून त्यांच्याकडून येणे रक्कमांचा तपशिल वसुलपात्र ठरविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही होत नसलेचे निदर्शनास आले आहे.

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ मधील कलम १३ अन्वये आकारण्यात आलेल्या किमान शुल्काच्या १ टक्के दराने वार्षिक शुल्क आकारणे आवश्यक आहे. उल्हासनगर मनपा क्षेत्रातील एकुण किती इमारतींना अग्निशमन विभागाने ना—हरकत दाखला दिला आहे. तसेच त्यापैकी किती इमारतधारकांनी वार्षिक शुल्काची रक्कम मनपा खाती जमा केली आहे? याबाबत अभिलेख लेखापरिक्षणास प्राप्त न झाल्याने वार्षिक शुल्क भराणा न केलेल्या इमारतींकडून वसुलपात्र रक्कमेची पडताळणी करता आली नाही. याबाबत प्राप्त अनुपालन एकूण १८ प्रकरणांची शुल्क रक्कम रू. ७९५०/— वसूल केलेचे नमूद आहे. परंतू सदर माहिती अपूर्ण आहे.

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ मधील कलम३ (३) अन्वये बसविण्यात आलेली अग्निशमन यंत्रणा कार्यक्षम व सुस्थितीत ठेवलेचे प्रमाणपत्र परवानाधारक अभिकरणामार्फत भोगवटाधारकाने प्रत्येक वर्षी जानेवारी व जुलै महिन्यात मुख्य अग्निशमन अधिकारी किंवा नामनिर्देशित अधिकारी यांच्याकडे सादर करणे आवश्यक आहे. परंतू याप्रमाणे प्रमाणपत्र संबंधित इमारतीकडून सादर करण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे

तरी वरिल आक्षेपांची पुर्तता करून पुर्तता अहवाल त्वरीत लेखापरिक्षण विभागास सादर करावा.

# अग्निशमन विभाग

(परिच्छेद क्र. १८)

अग्निशमन विभागाचे सन २०१३–१४ ते २०१६–१७ पर्यंतचे लेखापरिक्षण सुरू केले असता खालील अनियमितता दिसून येते.

**विषयः– अग्निसुरक्षा अभियानांतर्गत गाड्यांचे खरेदी कामातील अनियमिततेबाबत.**

महाराष्ट्र मुल्यवर्धित कर अधिनियम २००२ मधील कलम ४१ नूसार खरेदी करण्यात आलेल्या वस्तुचा उपयोग लोकांच्या फायदयाकरीता होणार असल्यास शासन सदर वस्तुंवर आकारलेला मुल्यवर्धित कर परतावा करीन, अशी तरतुद आहे. सदर वाहनांचा उपयोग अग्निशमन(सार्वजनिक) कार्यासाठी करण्यात येणार असल्याने यामध्ये कोणताही लाभ मिळविण्याचा उद्देश नसल्याने मुल्यवर्धित कराची रक्कम रू.१२९४७३/– प्रती वाहन प्रमाणे चार वाहनांकरीता रक्कम रू. ५१७८९२/– शासनाकडून प्रतिपुर्ती करून घेणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. अशंस २०१२/प्र.क्र. ४५/नवि–२०दि. ३१/०३/२०१२ अन्वये महानगरपालिकेस वाहन खरेदी करीता अनुदान प्राप्त झाल्यामुळे खरेदीच्या अनुषंगाने शासनास उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे.

महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम १९६५ च्या नियम ९४ ते १०० व १०२ नूसार संयम, यंत्रसामग्री फर्निचर व स्थिरवस्तु या सारख्या वस्तु खरेदी करून किंवा मिळविलेल्या जडवस्तु संग्रहातील सर्व वस्तुंची

वस्तुसुची नमूना क्र.८ मधील नोंदवहीत ठेवावयाची आहे. खरेदी केलेल्या अग्निशमन वाहनांची नोंद जड वस्तु संग्रह नोंदवहीत नोंदविणे आवश्यक आहे. परंतू नोंदीबाबत अभिलेख लेखापरीक्षणाकरीता प्राप्त झाले नाही.

तरी वरिल आक्षेपांची पुर्तता करून पुर्तता अहवाल त्वरीत लेखापरिक्षण विभागास सादर करावा.

# अग्निशमन विभाग

(परिच्छेद क्र. १९)

**अग्निशमन विभागाचे सन २०१३—१४ ते २०१६—१७ पर्यंतचे लेखापरिक्षण सुरू केले असता खालील अनियमितता दिसून येते.**

**विषय:—अग्निशमन गाडयांच्या फायर वॉटर टेंडरचे फॅब्रिकेशनचे कामातील अनियमितता बाबत.**

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक शुल्क नियंत्रक यांचे पत्र क्र. १२/कलम/३४/१३३/०९ दि. २०/०७/२००९ व मुद्रांक शुल्क अधिनियम १९५९ मधील कलम ६३ नुसार एकुण निविदा रकमेच्या रू. १० लक्षकरीता रू.१००/— व पुढील प्रत्येक लक्ष रूपयास रू. १००/—प्रमाणे कमाल रू.५,००,०००/— इतक्या रकमेच्या मर्यादित मुद्रांक शुल्क आकारणे आवश्यक आहे. कंत्राटाची रक्कम रू. ६८,६०,०००/— चा करारनामा रू. १००/— च्या मुद्रांक पेपरवर करण्यात आला आहे. करारनामा रू. ६०६०/— च्या मुद्रांक पेपरवर करणे आवश्यक होते. तरी शिल्लक रक्कम रू. ५९६०/— इतकी रक्कम वसुल करून शासन जमा करणे करणेबाबत अनियमितता दिसून येते.

नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. अशंस २०१२/प्र.क्र. ४५/नवि—२०दि. ३१/०३/२०१२ अन्वये महानगरपालिकेस वाहन खरेदी करीता अनुदान प्राप्त झाल्यामुळे खरेदीच्या अनुषंगाने शासनास उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे.

तरी वरिल आक्षेपांची पुर्तता करून पुर्तता अहवाल त्वरीत लेखापरिक्षण विभागास सादर करावा.

**मुख्य लेखा परिक्षक**
**उल्हासनगर महानगरपालिका**

# लेखा विभाग

(परिच्छेद क्र. २०)

**लेखा विभागाचे सन २०१३—१४ ते २०१६—१७ पर्यंतचे लेखापरिक्षण सुरू केले असता खालील अनियमितता दिसून येते.**

**विषयः— लेखा विभागातील रोख पुस्तक व इतर नोंदवहया तपासले असता खालील अनियमितता दिसून येते.**

लेखा विभागात महिना अखेरीस रोख पुस्तकातील शिल्लक रक्कम व बॅक पुस्तकातील शिल्लक रक्कम यांचा ताळमेळ आवश्यक आहे. तथापि सदरची कार्यवाही अदयावत करण्यात आलेली नसल्याचे निदर्शनास आले आहे.

तसेच महापालिकेने रोख पुस्तक रोजच्या रोज बंद करून शिल्लक रक्कम पुढच्या दिवशी पुढील तारखेला आरंभिची रक्कम दर्शविणे क्रमप्राप्त असतांना ती दर्शविण्यात आल्याचे निर्दशनास आलेले नाही.

लेखा विभागात विहित नमुन्यात रोख पुस्तक व इतर नोंदवहया ठेवून त्यामध्ये क्रमवार दिनांक संहित नोंद करणे आवश्यक आहे. तथापि नियमानुसार सदरची कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या लेखा विभागाकडून भविष्य निर्वाह निधीची नोंद वही विहीत नमुन्यात ठेवण्यात आलेली नाही. लेख्यांचे नोंदीमध्ये खाडाखोड, उपरीलेखन, व्हाईटिंगचा वापर करून नोंद मध्ये बदल करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. सदर बदल फेरफार केलेल्या नोंदी सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केल्याचे निदर्शनास येत नाही.

सन २०१४–१५ या आर्थिक वर्षात कोणताही आर्थिक व्यवहार झालेला नाही. सदर रक्कम भविष्य निर्वाह निधीच्या गुंतवलेल्या रक्कमाप्रमाणे मुदतठेवीत गुंतवण्यात आली नाही. सदर रक्कमेवरील सन एप्रिल २०१४ ते मार्च २०१५ या कालावधिच्या व्याजाचे नुकसान झाले असल्याचे निर्दशनास आले आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या भविष्य निर्वाह निधिचे खाते एकाच बॅकेमध्ये आवश्यक आहे. तथापि ते वेगवेगळया बॅकामध्ये आहे. उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या भविष्य निर्वाह निधीचे बॅक खाते ०२ वेगवेगळया बॅकेत उघडण्यात आले आहे. एकाच निधिचे ०२ वेगवेगळया बॅकेत खाते उघडण्यात आल्याचे दिसून येते.

लेखा विभागातील प्रलंबित शासकीय अदायगीची रक्कमेत दिवसेंदिवस वाढ होत असल्याचे दिसून येते. सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांचे उपदान व इतर देय रक्कमा आणि कार्यरत कर्मचाऱ्यांचे भ.नि.नि. रक्कमा वेळेच्या वेळी भरणा केल्याचे दिसत नाही. तसेच I.T./VAT/ इत्यादी शासकीय रक्कमा भरणा करणे आवश्यक आहे त्यामुळे शासकीय रक्कमा अदायगी करण्याचे प्रलंबित असल्याचे दिसते.

तरी वरिल आक्षेपांची पुर्तता करून पुर्तता अहवाल त्वरीत लेखापरिक्षण विभागास सादर करावा.

**मुख्य लेखा परिक्षक**
**उल्हासनगर महानगरपालिका**

## वाहन विभाग

(परिच्छेद क्र.२१)

**वाहन विभागाचे सन २०१३–१४ ते सन १६–१७ पर्यंतचे लेखापरिक्षण केले असता खालील अनियमितता दिसून आली.**

**विषय:–महानगरपालिकेच्या जड व हलक्या वाहनांच्या इंधनावर झालेल्या खर्चातील अनियमिततेबाबत.**

महानगरपालिकेच्या वाहन विभागात २०१४–१५ या आर्थिक वर्षात जड वाहने ३९ तसेच हलकी वाहने ११ एकुण ५० वाहने कार्यरत आहेत.

१) महानगरपालिकेने नगरपालिका लेखासंहिता १९७१ नियम १५३ नुसार नमुना क्र.१२७ नुसार प्रत्येक वाहनासाठी ठेवलेल्या स्कंद नोदवहया (लॉगबुक) यांची तपासणी करण्यात आली असता स्कंद नोदवहीमध्ये प्रत्येक दिवशी वाहन धावलेल्या किलोमीटर्सची संख्या नोंदविण्यात आलेली नाही. प्रवास कोठून ते कुठपर्यंत केला याबाबतच्या नोंदी नोंदविण्यात आलेल्या नाहीत एकूण वापरलेले इंधन तसेच खर्चाचे प्रमाणक क्रमांक व दिनांक अशा नोंदी घेण्यात आल्या नाहीत, प्रवासाचे प्रयोजन नोंदविण्यात आलेले नाही. वरील बाबी नियमानुसार स्कंद नोंदवहीत नोंदी घेण्यात आल्या नाहीत.

२) वाहनांच्या स्कंद नोंदवहीमध्ये वाहनांची दरमहा एकूण झालेली सरासरी धाव तसेच वार्षिक सरासरी धाव यांचा गोषवारा काढण्यात आलेला नाही. वाहनांचे मॉडेल वर्ष यांच्या नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे वाहनांची प्रतिलिटर इंधनामागे किलोमीटर धाव योग्य असल्याची तपासणी करता आली नाही. वाहनांची मासिक व वार्षिक

सरासरी धाव व प्रती किलोमीटर सरासरी इंधन वापर यांचे वेळोवेळी गोषवारे घेतलेले नाहीत.

# वाहन विभाग

(परिच्छेद क्र.२२)

**वाहन विभागाचे सन २०१३–१४ ते सन १६–१७ पर्यंतचे लेखापरिक्षण केले असता खालील अनियमितता दिसून आली**

**विषयः— महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना कार्यालयीन कामकाजासाठी भाडेतत्वावरील देण्यात आलेल्या वाहना वरील खर्चातील अनियमिततेबाबत.**

वाहनांच्या वापरासंबंधी नोदवही ठेवण्यात आली नाही. ठेकेदाराला कार्यादेश देण्यापूर्वी पुरवठा केलेली वाहने २००५ नंतरची असल्याबाबत खात्री करून कार्यादेश देण्यात आलेले नाही.

१) प्रस्तुत भाडेतत्वावर वाहने पुरविण्याचा ठेका मे.अनमोल ट्रान्सपोर्ट यांना वेळोवेळी, आवश्यक असलेली वाहने पुरविणेबाबत कार्यादेश देण्यात आलेले आहेत. त्यांच्याकडून करारनामा करून निविदा अटी व शर्ती क्र.१९ नुसार पुरवठा करण्यात येणारी वाहने ही नविन किंवा २००५ नंतरची (म्हणजे २००६ पासून)खरेदी केलेली असावी. व सर्व वाहनाचे आर.टी.ओ नियमाप्रमाणे सर्व पेपरची पूर्तता कार्यादेश देतेवेळी करावी असे नमूद करण्यात आले. परंतू ठेकेदाराला कार्यादेश देण्यापूर्वी पुरवठा केलेली वाहने २००५ नंतरची असल्याबाबत खात्री करून कार्यादेश देण्यात आल्याचे दिसून येत नाही.

२) वाहन विभाग कार्यालयात पुरवठादाराकडून प्रत्येक महिन्यात कार्यादेश देऊन किती व कोणत्या प्रकारची वाहने ठेक्याने किती दिवसा साठी मागविण्यात आली व अशा वाहनांचा वापर कोणत्या अधिकाऱ्यांनी केला याबाबतचा संपूर्ण तपशिल ठेवणे बाबत निविदा अटी व शर्तीनुसार स्वतत्र नोंदवही ठेवून अशा, नोदी नोंदविण्यात

आलेल्या आढळून येत नाही त्यामुळे भाडयाने घेण्यात आलेली वाहने यांचा योग्य वापर झाल्याची खात्री करता येत नाही.

# वाहन विभाग

(परिच्छेद क्र.२३)

**वाहन विभागाचे सन २०१३–१४ ते सन १६–१७ पर्यंतचे लेखापरिक्षण केले असता खालील अनियमितता दिसून आली**

**विषय:– अधिकृत ठेकेदारामार्फत वाहनांची दुरूस्ती न केलेबाबत.**

वाहन विभागातील सर्व वाहनांच्या दुरूस्तीसाठी अधिकृत ठेकेदार असलेल्या गॅरेजमधून तीन दरपत्रके मागवून न्यूनत्तम दर असलेल्या गॅरेजवाल्याकडून वाहन दुरूस्ती करावयाची असताना सर्व वाहनांची दुरूस्ती स्थानिक अधिकृत नसलेल्या गॅरेजवाल्याकडून वाहने दुरूस्त करून घेण्यात आलेली आहेत.

महानगरपालिकेच्या सर्व वाहनांच्या दुरूस्तीसाठी केलेल्या खर्चाचे हिस्ट्रीशिट यांची तपासणी केली असता अशी नोदवही विहित नमुन्यात ठेवण्यात आलेली नाही. प्रतिमहा वाहनाच्या दुरूस्तीचा गोषवारा तसेच वाहनावरती झालेल्या खर्चाची बेरीज घेऊन मेळ घेण्यात आलेला नाही.

वाहनांचे हिस्ट्रीशिटमध्ये वाहनाचे मॉडेल, वर्ष, इंजिन चेसी क्रमांक, विमा इत्यादी बाबतची माहिती आरटीओ पासिंग आरसी बुकची प्रत इत्यादी नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत. तसेच नोंदवहीवर वाहनप्रमुखांनी तपासणी केल्याबाबत स्वाक्षरी केलेली नाही.

## वाहन विभाग

(परिच्छेद क्र.२४)

**वाहन विभागाचे सन २०१३–१४ ते २०१६–१७ पर्यंतचे लेखापरिक्षण सुरू केले असता खालील अनियमितता दिसून येते.**

**विषयः—वाहनांच्या दुरूस्तीवर विहित मर्यादेपेक्षा जास्त खर्च केल्याबाबत.**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालकीची २०१३–१४ या आर्थिक वर्षात एकुण ३९ अवजड व ११ हलकी वाहने असुन प्रस्तुत वाहनांच्या दुरूस्तीचे अभिलेखे यंची तपासणी केली असता वाहनांच्या दुरूस्तीवरील खर्चाबाबत महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग शा.नि.क्र. संकीर्ण/२००७/वाहन खरेदी/प्र.क्र.२७/२००८ नवि. २६ दि. १८/०२/२००८ नुसार काटकसरीच्या धारणाची अपाययोजना करून उपलब्ध निधीचा जास्ती जास्त सुयोग्य वापर हाण्यासाठी व महानगरपालिकेकडील असलेली वाहने सुस्थितीत ठेवण्यासाठी आणि त्याच्या दुरूस्तीच्या खर्चास मंजुरी देण्यासाठी काही विहीत पध्दती अंमलात आणलेल्या असुन त्यानुसार अतिरिक्त आयुक्त यांना पेट्रोलवर चालणाऱ्या प्रत्येक वाहनासाठी २५००० व डिझेल वर चालणाऱ्या वाहनासाठी रू. ३००००/— (टायर, टयुब,बॅटरी इ. खर्चासह) खर्च करण्याच्या मंजूरीच्या शक्ती प्रदान केलेल्या आहेत.

उपरोक्त शासन निर्णयामध्ये सर्व वाहनांच्या दुरूस्तीसाठी अधिकृत ठेकेदार असलेल्या गॅरेज मधुन तीन दरपत्रके मागवून न्युनत्तम दर असलेल्या गॅरेजवाल्याकडून वाहने दुरूस्त करून घेण्यात आलेली आहेत. यामध्ये अनियमितता झालेली आढळून येते.

महानगरपालिकेच्या सर्व वाहनाच्या दुरूस्तीसाठी केलेल्या खर्चाचे हिस्ट्रीशीट(इतिहास पुस्तिका) याची तपासणी केली असता अशी नोदवही

विहित नमुन्यात ठेवण्यात आलेली नाही. प्रतिमहा वाहनाच्या दुरूस्तीचा गोषवारा तसेच वाहनावरती झालेल्या खर्चाची बेरीज घेउन मेळ घेण्यात आलेला नाही. त्यामुळे वर्षामध्ये प्रत्येक वाहनावर दुरूस्तीसाठी झालेल्या खर्चाची लेखापरिक्षणास खात्री झाली नाही.

वाहनांचे हिस्ट्री शिट(इतिहास पुस्तक) मध्ये वाहनाचे मॉडेल वर्ष, इंजिन चेसी क्रमांक,विमा इ. बाबतची माहिती, आरटीओ पासिंग, आरसी बुकची प्रत इ. नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत तसेच नोंदवहीवर वाहनप्रमुख यांनी तपासणी केल्याबाबत स्वाक्षरी केलेली नाही.

# वाहन विभाग

(परिच्छेद क्र.२५)

**वाहन विभागाचे सन २०१३—१४ ते २०१६—१७ पर्यंतचे लेखापरिक्षण सुरू केले असता खालील अनियमितता दिसून येते.**

- सन २०१३—१४ या वित्तीय वर्षाचे अर्थसंकल्पीय नियंत्रण नोंदवही तपासणी केली असता नोंदवही मध्ये AA-2(9) Vehicle Allounce of Officer (तरतुद रूपये 2000000)या हेड मध्ये पान क्रं. 11 मध्ये दिनांक 25/11/2013पर्यंत शिल्लक रूपये 979463 इतकी असायला पाहिजे परंतु बुकात शिल्लक रूपये 1884250 इतकी रक्कम नमुद करण्यात आल्याचे , तसेच एकूण खर्चा मध्ये रूपये 1020537 असायला पाहिजे परंतु प्रत्यक्षात रूपये 115750 इतकी रक्कम नमुद करण्यात आल्याचे आढळून आले. दिनांक 28/11/2013 ते 13/03/2014 पर्यंत पानक्रं. 11,93,94,95,87,57 तपासले असता एकूण रूपये 1674974 इतक्या देयकाचा खर्च झालेला आहे. मुळ तरतुद रूपये 2000000 मधुन वजा जाता शिल्लक रूपये 325026 इतकी रक्कम शिल्लक असायला पाहिजे, परंतु प्रत्यक्ष बुकात पान क्रं. 57 मध्ये रूपये 1130667 इतकी रक्कम शिल्लक व एकूण रूपये 869333 रक्कम खर्च नमुद करण्यात आल्याचे आढळून आले.
- शव वाहिणीच्या पावती द्वारे वसुल केलेल्या रक्कमेची अनियमितता.

सन २०१३–१४ या वित्तीय वर्षाचे कॅशबुक, पावती पुस्तके व चलनाची तपासणी केली असता. खालील बाबी निदर्शनास आल्या.

| अ.क्र. | दिनांक | पावतीक्रमांक | रक्कम रूपये |
|---|---|---|---|
| 1 | 23/10/2013 | 153878 | 700 |
| 2 | 3/11/2013 | 153879 | 700 |
| 3 | 5/11/2013 | 153880 | 700 |
| 4 | 29/10/2013 | 153881 | 350 |
| 5 | 28/10/2013 | 153882 | 700 |
| 6 | 26/10/2013 | 153883 | 700 |
| 7 | 21/11/2013 | 153884 | 700 |
| 8 | 4/11/2013 | 153885 | 2600 |
| 9 | 8/11/2013 | 153886 | 350 |
| 10 | 12/11/2013 | 153887 | 700 |
| एकूण | | | 8200 |

१ पावती पुस्तकातील रक्कम रोजच्या रोज भरणा करण्यात येत नाही.

वरील दर्शविलेली रक्कम हि दिनांक– २५/११/२०१३ रोजी भरण्यात आल्याचे आढळून आलेले आहे. सदरची रक्कम दि. २३/१०/२०१३पासून जमा झालेली असतांना दि. १२/११/१३ रोजी जमा करण्यात आलेली आहे याचा सविस्तर खुलासा करावा.

| अ.क्र. | दिनांक | पावतीक्रमांक | रक्कम रूपये |
|---|---|---|---|
| 1 | 9/11/2013 | 153888 | 700 |
| 2 | 11/11/2013 | 153889 | 700 |
| 3 | 13/11/2013 | 153890 | 700 |
| 4 | 14/11/2013 | 153891 | 350 |
| 5 | 12/11/2013 | 153892 | 700 |
| 6 | 2/11/2013 | 153893 | 700 |
| 7 | 16/11/2013 | 153894 | 350 |
| 8 | 22/11/2013 | 153895 | 700 |
| 9 | 25/11/2013 | 153896 | 700 |
| 10 | 30/11/2013 | 153897 | 700 |
| 11 | 4/12/2013 | 153898 | 350 |
| 12 | 12/12/2013 | 153899 | 700 |
| 13 | 11/12/2013 | 153900 | 350 |
| 14 | | 173601 | 700 |
| 15 | | 17602 | 700 |
| 16 | 27/11/2013 | 17603 | 700 |
| 17 | 1/12/2013 | 17604 | 700 |
| 18 | 3/12/2013 | 17605 | 700 |

| | | | |
|---|---|---|---|
| 19 | 4/12/2013 | 17606 | 700 |
| 20 | 5/12/2013 | 17607 | 700 |
| 21 | 8/12/2013 | 17608 | 700 |
| 22 | 15/12/2013 | 17609 | 350 |
| 23 | 18/12/2013 | 17610 | 700 |
| 24 | 21/12/2013 | 17611 | 700 |
| एकूण | | | 15400 |

वरील दर्शविलेली रक्कम हि दिनांक—२१/१२/२०१३ रोजी भरण्यात आल्याचे आढळून आलेले आहे. सदरची रक्कम दि. ९/११/२०१३ पासून जमा झालेली असतांना पुर्ण रक्कम दि. २१/१२/२०१३ रोजी भरण्यात आलेली आहे याचा खुलासा करावा.

वरील दोन तक्त्या वरून व तसेच २०१३—१४ मध्ये कोणतीही पावती पुस्तकाची रक्कम रोजच्या रोज भरणा केलेली आढळून आलेली नाही.

२) पावती तारखे प्रमाणे अनुक्रमाने फाडण्यात आलेली नाही.

३) रोख नोंदवहित पेज क्रमांक दिलेला आढळून आलेला नाही.

४) कॅशबुकात पावती क्रमांकाच्या समोर तारीख आढळून आलेला नाही.

- महापालिकेच्या नियमानुसार नुसार प्रत्येक वाहनासाठी ठेवलेल्या स्कंद नोंदवहया (लॉगबुक) यांची तपासणी करण्यात आली असता स्कंद नोंदवहीमध्ये प्रत्येक दिवशी वाहन धावलेल्या किलोमीटर्सची संख्या नोदविण्यात आलेली नाही. प्रवास कोठून ते कुठपर्यंत केला याबाबतच्या नोंदी नोदविण्यात आलेल्या नाहीत एकुण वापरलेले इंधन तसेच खर्चाचे प्रमाणक क्रमांक व दिनांक अशा नोदी घेण्यात आल्या नाहीत प्रवासाचे प्रयोजन नोंदविण्यात आलेले नाही वरील नियमानुसार स्कंद नोदवहीत नोंदी घेण्यात आल्या नाहीत.
- वाहनांच्या स्कंद नोंदवहीमध्ये वाहनांची दरमहा एकुण झालेली सरासरी धाव तसेच वार्षिक सरासरी धाव यांचा गोषवारा काढण्यात आलेला नाही वाहनांचे मॉडेल वर्ष यांच्या नोंदी घेण्यात आलेल्या

नाहीत त्यामुळे वाहनांची प्रतिलिटर इंधनामागे किलोमीटर धाव योग्य असल्याची तपासणी करता आली नाही

- वाहन विभागात जड वस्तु संग्रह नोंदवही ठेवणे आवश्यक आहे त्यामध्ये वाहनांची नोंद घेणे आवश्यक आहे. परंतु तशा प्रकारची कार्यवाही होत नसल्याचे आढळुन आलेले आहे.

तरी वरिल आक्षेपांची पुर्तता करून पुर्तता अहवाल त्वरीत लेखापरिक्षण विभागास सादर करावा.

**मुख्य लेखा परिक्षक**
**उल्हासनगर महानगरपालिका**

# जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी नुतनीकरण मोहिम

(परिच्छेद क्र.२६)

**जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी** नूतनीकरण **मोहिम विभागाचे सन २०१३–१४ ते सन १६–१७ पर्यंतचे लेखापरिक्षण केले असता खालील अनियमितता दिसून आली**

**विषय:– जवाहारलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियान (JNNURM) योजनेअंतर्गत पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेच्या कामाबाबत अभिलेख उपलब्ध न झालेबाबत.**

सन २०१४–१४ मध्ये काही काम केली त्यामध्ये कामाबााबत काही अनियमितता आढळून आल्या आहेत.

योजनेच्या कामाचे मंजूर डीपीआर, प्रशासकीय मंजुरी, अंदाजपत्रक, तांत्रिक मंजुरी तसेच त्यासंबंधातील दरसुच्या व दर पृथ:करणे, केंद्र शासनाची व राज्य शासन मंजुरी, निविदा नस्ती, निविदा अटी शर्ती, प्राप्त निविदा, निविदा मंजुरी प्रस्ताव, निविदा मंजुरी ठराव, कार्यादेश व करारनामा, सुधारित प्रशासकिय मंजुरी व सुधारित अंदाजपत्रक, सुधारित तांत्रिक मंजुरी व संबंधित जिल्हा दरसुच्या व दरपृथ:करणे सुधारित निविदा नस्ती, सुधारित निविदा अटी शर्ती, प्राप्त निविदा, सुधारित निविदा मंजुरी प्रस्ताव, सुधारित मंजुरी ठराव, सुधारित कार्योदेश व करारनामा, केंद्र व राज्य शासनांकडून प्राप्त अनुदाने, कर्जे यांचा तपशिल तसेच केंद्र व राज्य शासनास पाठविलेली प्रमाणपत्रे, मोजमाप पुस्तिका व प्रमाणके व वेळोवेळी शासनास कामाचा प्रगतीचे पाठविलेले अहवाल इत्यादी अभिलेखे तपासणीस उपलब्ध करून देणेत आले नाहीत.

शासकीय विमा निधीकडे विमा उतरविण्यात यावा अशी अट असल्याचे व कंत्राटदाराकडून शासकीय विमा निधीकडे विमा उतरविण्यात आला नसल्याचे नमूद करण्यात आले आहे. कामाचा व कामगारांचा विमा उतरवल्याची कागदपत्रे तपासणीस उपलब्ध झाली नाहीत. लेखापरीक्षणात सादर केलेल्या देयकातून १% विमा रक्कम कपात करण्यात आलेली नाही.

मुख्य लेखा परिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

# स्थानिक संस्था कर विभाग

(परिच्छेद क.२७)

**स्थानिक संस्था कर विभागाचे सन २०१३–१४ ते सन १६–१७ पर्यंतचे लेखापरिक्षण केले असता खालील अनियमितता दिसून आली**

**विषयः—स्थानिक संस्था कर विभागात भांडार विभागाकडून** वसुलीसाठी **वापरणेस दिलेली पारगमन शुल्क** पावतीपुस्तके **सामान्य पावती पुस्तके तपासणीस उपलब्ध न होणे बाबत.**

१) भांडार विभागाकडून वसुलीसाठी प्राप्त पावती पुस्तकांची स्थानिक संस्था कर विभागाने साठा नोंदवही ठेवून विनियोगाचे हिशेब ठेवणे आवश्यक असताना अशी साठा नोंदवही तपासणीस झाली नाही. त्यामुळे प्राप्त पावती पुस्तके, वापरलेली पावती पुस्तके व शिल्लक पावती पुस्तकांची पडताळणी करता आली नाही.

२) वसुलीसाठी वापरलेली पावती पुस्तकांच्या स्थळप्रती तपासणीस उपलब्ध न झाल्याने भांडार विभागाने वापरास दिलेल्या पावती पुस्तकाव्दारेच वसूल झाल्याचे व पावतीव्दारे वसूल सर्व रक्कम वेळच्या वेळी महानगरपालिका निधीत जमा केल्याची पडताळणी करता आली नाही.

३) सामान्य पावतीव्दारे वसूल रक्कमाबाबत जमा नोंदवही, भरणा चलने, रोखपालाकडे रक्कम जमा केल्याची पोहोच तसेच पावत्यांच्या स्थळप्रती इ. तपासणीस उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे वसूल केलेल्या सर्व रक्कम वेळच्यावेळी म.न.पा. निधीत जमा केल्याची पडताळणी करता आली नाही.

# स्थानिक संस्था कर विभाग

(परिच्छेद क्र.२८)

**स्थानिक संस्था कर विभागाचे सन २०१३–१४ ते २०१६–१७ पर्यंतचे लेखापरिक्षण सुरू केले असता खालील अनियमितता दिसून येते.**

१) महानगरपालिकेच्या स्थानिक संस्था कर विभागाकडून अपेक्षित स्थानिक संस्थाकर वसूली साठी प्रभाविपणे अंमलबजावणी केल्याचे दिसून येत नाही.

२) स्थानिक संस्थाकर नियम २०१० मधिल तरतूदीनुसार प्रत्येक कर भरणा करणेस प्राप्त व्यापारी संस्थेची नोंदणी करणे, विहित मुदतीत कर न भरल्यास नोटीस देणे व्याजाची आकारणी करणे, वार्षिक विवरणे सादर न करणाऱ्या संस्थांवर शास्तीची आकारणी करून वसूल करणे, प्रतिभूती घेणे, निर्धारण करणे, प्रत्यक्ष जागेवर जाऊन तपासणी करून कार्यवाही करणे, प्राप्त विवरण पत्र तपासून आवश्यक कागदपत्रे मागविणे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५२ प्रमाणे कार्यवाही करणे या नियमानुसार प्रभावीपणे कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

३) मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम २०१० नियम २९(२) नुसार व्यापाऱ्याने नमुना ई–२ मध्ये वार्षिक विवरण दाखल करून त्यासोबत बॅंक चलन जोडणे व कर भरणा केल्याचे नमुद करणे आवश्यक असतांना वार्षिक विवरण सादर केल्याचे निर्दशनात येत नाही.

४) मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम २०१० नियम ४८(६) अन्वये व्यापारी किंवा व्यक्ती यांनी पुरेशा

कारणाशिवाय कोणत्याही कालावधीचे विवरण विहीत कालावधीत भरण्यास कसूर केली असेल तर महानगरपालिकेच्या स्थानिक संस्था कर विभागाकडून अशा व्यापारी किंवा व्यक्ति यांचेवर त्यांना त्यांची म्हणने ऐकुण घेण्याची वाजवी संधी दिल्यानंतर रू. ५०००/— मात्र पेक्षा अधिक नसेल एवढी रकमेची शास्ती लावण्याबाबतची कोणत्याही प्रकारची कार्यवाही काटेकोरपणे केली नसल्याचे निर्दशनास आले आहे.

तरी वरिल आक्षेपांची पुर्तता करून पुर्तता अहवाल त्वरीत लेखापरिक्षण विभागास सादर करावा.

मुख्य लेखा परिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

# विधि विभाग

(परिच्छेद क्र.२९)

**विधि विभागाचे सन २०१३—१४ ते सन १६—१७ पर्यंतचे लेखापरिक्षण केले असता खालील अनियमितता दिसून आली**

**विषय:—विधि विभागाचे लेखे तपासणीस न झालेबाबत.**

विधि विभागाने वित्तीय वर्ष २०१३—१४ व २०१४—१६ मध्ये अनुक्रमे रू.४९,९९,००० रू.६१,०१,००० खर्च दावे, खटले व वकील फी साठी केल्याने सन २०१५—१६ च्या अर्थसंकल्पातील मागील वर्षातील प्रत्यक्ष खर्चाच्या तपशिलावरून दिसून येते. या बाबत दावे खटले नोंदवही, वकील PANNEL नेमणूक ठराव व दर, बिल नोंदवहया, उच्च न्यायालय व इतर न्यायालये दराबाबत मंजूर टिप्पण्या वकील नेमणुकीचे आदेश, खर्च प्रमाणके बाबतचे लेखे इ. लेखा परीक्षणास देणेत आले नाहीत.

महाराष्ट्र स्थानिक निधी प्राधिकरणाची जबाबदारी अधिनियमाचे कलम ४ नुसार लेखापरीक्षणास अभिलेखे उपलब्ध करून देणेची स्थानिक प्राधिकरणाची जबाबदारी असताना अभिलेखे तपासणीस देणेत आले नाहीत.

**मुख्य लेखा परिक्षक**
**उल्हासनगर महानगरपालिका**

## नगर सचिव विभाग

(परिच्छेद क्र. ३०)

**नगर सचिव विभागाचे सन २०१३–१४ ते २०१६–१७ पर्यंतचे** लेखापरिक्षण **सुरू केले असता खालील अनियमितता दिसून येते.**

१) नगर सचिव विभागात माहिती अधिकार अधिनियमान्वये छायांकित प्रति देण्यासाठीची रक्कम वसूल करण्यासाठी पावती पुस्तक भांडार विभागातून मागविली आहेत. परंतू पावती पुस्तकांचा वापर करण्यापूर्वी भांडार विभागाकडून पावती पुस्तके किती मागविली याबाबतची नोंद वही ठेवणे क्रमप्राप्त आहे. नगर सचिव विभागाने पावती पुस्तक साठा नोंदवही तयार ठेवलेली नाही.

२) भांडार विभागातून प्राप्त करून घेतलेल्या किती पावती पुस्तकांचा वापर केला व किती शिल्लक आहेत याची नोंद नाही.

३) रोख नोंदवही ठेवलेली आहे परंतू सदर नोंदवही मध्ये पृष्ठ क्रमांक दिलेले नाहीत तसेच सक्षम अधिकारी यांचेकडून नोंदवही प्रमाणित करून घेतलेले नाही.

४) दि. १७/१/२०१७ रोजीचा बैठकीचा परिवहन सदस्य यांना अतिरिक्त भत्ता अदा करण्यात आलेला आहे परंतू सदर अदा केलेली अतिरिक्त रक्कम त्यांच्याकडून वसूल केलेली आहे, तथापि वसूल केलेली रकमेची पावती बनविणे आवश्यक होते व ती पावती न बनवताच लेखा विभागात रक्कम जमा केलेली दिसून येते.

तरी वरिल आक्षेपांची पुर्तता करून पुर्तता अहवाल त्वरीत लेखापरिक्षण विभागास सादर करावा.

**मुख्य लेखा परिक्षक**
**उल्हासनगर महानगरपालिका**

## दीनदयाळ अंत्योदय योजना
## राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान
## योजना विभाग

(परिच्छेद क्र.३१)

**राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान योजना विभागाचे सन २०१३ – २०१४ ते सन २०१६–२०१७ या कालावधीचे लेखा परिक्षण केले असता खालील प्रमाणे अनियमितता दिसून येते.**

१) उल्हासनगर महानगरपालिका अंतर्गत कार्यरत सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेसाठी केंद्र तसेच राज्य शासनाने दिलेले अनुदान व त्यातुन करण्यात आलेल्या खर्चासाठी रोख पुस्तक नगरपालिका लेखा संहिता परिच्छेद क्र.५.३ या प्रपत्रात ठेवण्यात आलेले नाही.

२) सदरील रोख पुस्तकात रोजच्या रोज नोंदी घेवून बंद करणे व त्या दिवसाची अंतिम शिल्लक काढुन ती खाते प्रमुखाने स्वाक्षरीत करणे आवश्यक आहे तथापी या प्रमाणे सुवर्णजंयती शहरी रोजगार योजनेच्या रोख पुस्तकात रोजच्या रोज नोंदी घेण्यात येत नसल्याचे दिसुन आले ही गंभीर अनियमितता आहे. प्रत्यक्षात ज्या दिवशी खर्च होईल त्याच दिवशी ती उपरोक्त रोखपुस्तकात नोंदविणे आवश्यक आहे. मात्र तसे न करता बॅकेच्या विवरणपत्राप्रमाणे (पासबुक) रोख पुस्तकात नोंदी घेणे ही गंभीर अनियमितता आहे.

# दीनदयाळ अंत्योदय योजना
# राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान
# योजना विभाग

(परिच्छेद क्र. ३२)

**राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान योजना विभागाचे सन २०१३ – २०१४ ते सन २०१६–२०१७ या कालावधीचे लेखापरिक्षण केले असता खालील प्रमाणे अनियमितता दिसून येते.**

१) २०१३–१४ मध्ये आरंभीची शिल्लक रक्कम एकुण १,११,५९,३९३/– शिल्लक असुन व प्राप्त निधी ४६,३३,९३८/– असा एकुण निधी १,५७,९३,३३१ असा आहे व एकुण खर्च १४,५०,७५६/– झालेला आहे व एकुण बॅकेत व्याज ४८६९६९ एवढे जमा झालेले आहे. तरी रोख नोंदवही एकुण १,४८,५५,६२९/– एवढी शिल्लक असणे आवश्यक असतांना एकुण १,४८,५५,२०६/– एवढी शिल्लक आहे. एकुण ४२३ ची तफावत आढळुन आलेली आहे. तरी बॅकेने कोणत्या प्रकारचे चार्जेस कपात केले त्याबाबत खुलासा सादर करावा.

२) वर्षा अखेरीस एवढया प्रमाणात रक्कम शिल्लक राहील्याचे दिसून आले सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत सात घटकावर केंद्र. राज्य शासनाने दिलेले अनुदान पुर्णपणे खर्च करणे आवश्यक असून प्रत्येक घटकावरील भौतिक साध्य उद्दिष्टे हे दारिद्रय निर्मुलन कक्षाचे प्राथमिक कर्तव्य आहे मात्र त्याप्रमाणे उद्‌दीष्टे साध्य न केल्याने संबंधीत दारीद्रये रेषेखाली लाभार्थी लाभापासुन वंचीत राहीलेले आहेत. अखर्चित रक्कम शासनास परत करण्यात आलेली नाही.

३) काही प्रमाणात प्रमाणकांच्या नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत किंवा त्रृटी आढळुन आल्या त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

दीन दयाल अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान योजना विभागाचे लेखा परिक्षण केले असता, शहरी स्वंय रोजगार कार्यक्रम या योजने अंतर्गत बचत गटांना जाहिर केलेल्या रू. १००००/— रक्कमे बाबत टिप्पणी (बचत गटांची यादी) मंजुर करून घेणेत आलेली नसून विहित कार्यपध्दतीचा अवलंब केल्याचे निदर्शनास आलेले नाही. तसेच खर्चाचे देयक उपलब्ध करून देणेत आलेले नाही. तथापि, टिप्पणी व खर्चाचे देयक तयार करण्यात आलेले नाहीत असे निदर्शनास आले आहे.

# दीनदयाळ अंत्योदय योजना
# राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान
## योजना विभाग

(परिच्छेद क्र.३३)

**राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान योजना विभागाचे सन २०१३ – २०१४ ते सन २०१६–२०१७ या कालावधीचे लेखापरिक्षण केले असता खालील प्रमाणे अनियमितता दिसून येते.**

१) प्रमाणक क्र.६५९ श्रीम. छाया रोशन कदम यांचे एकुण रू. २५०००– रक्कम मंजुर झाल्याचे मंजुरी आदेश व सबंधित नस्ती उपलब्ध करून दिलेले नाही.

२) प्रमाणक क्र. ६६१ श्री. जयेश जाधव यांचे एकुण रू. ५००००/– रक्कम मंजुर झाल्याचे मंजुरी आदेश व सबंधित नस्ती उपलब्ध करून दिलेले नाही.

३) प्रमाणक क्र. ४८७ श्री. सोमनाथ बाबुराव दिवेकर यांना त्यांचे एकुण रू.५००००/– रक्कम मंजुर झाल्याचे सबंधित मंजुरी आदेश उपलब्ध करून दिलेले नाही.

४) प्रमाणक क्र. ४८७ श्री. तुकाराम काशिनाथ काळे यांना त्यांचे एकुण रू.७५००/– रक्कम मंजुर झाल्याचे सबंधित मंजुरी आदेश उपलब्ध करून दिलेले नाही.

५) प्रमाणक क्र. ४८७ श्रीम. सुमन प्रेमचंद गजबी यांना त्यांचे एकुण रू.२५०००/– रक्कम मंजुर झाल्याचे सबंधित मंजुरी आदेश उपलब्ध करून दिलेले नाही.

६) खर्चाचे देयक क्र.३०८ दि.२८/२/२०१४ माहे सप्टेंबर, २०१३ ते जाने २०१४ पर्यंतचा प्रवास भत्ता आणि झेरॉक्स बिल यावर मा. उप आयुक्त यांची अंतिम स्वाक्षरी घेण्यात आलेली नाही.

झेरॉक्स बिल, प्रवास भत्ता या बिलांवर paid by me, pass for payment याप्रमाणे विहित कार्यपध्दतीचा अवलंब केलेला नाही.

मिटींगला उपस्थित राहणेकरीता प्रवास करणेसाठीचा मा. वरिष्ठांचा कार्यादेश मंजूर करून घेतलेला नाही.

७) खर्चाचे देयक क्र. ३०९ दि. ८/३/२०१४ यावर मा. उप आयुक्तांची स्वाक्षरी नाही

# दीनदयाळ अंत्योदय योजना
# राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान
# योजना विभाग

(परिच्छेद क्र.३४)

**राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान योजना विभागाचे सन २०१३ – २०१४ ते सन २०१६–२०१७ या कालावधीचे लेखापरिक्षण केले असता खालील प्रमाणे अनियमितता दिसून येते.**

१) कर्मचारी यांना नेमून दिलेले उद्दिष्ट व केलेले साध्य या कामाचा अहवाल सादर केलेनंतर सदर अहवाल कोणतेही सक्षम अधिकारी (प्रकल्प अधिकरी) यांनी प्रमाणित केलेले नाही. फक्त कर्मचाऱ्यांची स्वाक्षरी आहे. तथापि कर्मचाऱ्यांना वेतन केलले आहे.

२) माहे डिसेंबर २०१४ चे कर्मचारी यांचे कामाचे अहवाल नसतांना त्यांना मानधन अदा करण्यात आलेले आहे. प्रत्येक महिन्याच्या अखेरच्या तारखेस रोख नोंद वहीमध्ये गोषवारा (summary) आवश्यक असतांना त्याची नोंद घेण्यात आलेली नाही. तसेच ज्या महिन्यात व्यवहार झाला नाही त्या महिन्यात निरंक अशी नोंद घेणे आवश्यक आहे. परंतू ती नोंद घेण्यात आलेली नाही. सदर बाबतीत अनियमितता आढळून आलेली आहे.

लेखापरिक्षणाच्या वेळी निदर्शणास आले की कर्मचारी यांचे ठरविलेले मानधन बॅंके मार्फत अदाई करण्यात येत आहे. तथापि सदरचे देयक अदा केले बाबतचे स्वाक्षऱ्या मानधन वाटप केल्याचे रजीस्टर ठेवुन त्यामध्ये कर्मचाऱ्याच्या महसुल मुद्रांक रू.०१/–स्वाक्षऱ्या घेतलेल्या नाहीत. त्यामुळे शासन महसुलाचे नुकसान झालेले आहे व कर्मचाऱ्यांकडून व्यवसाय कराची वसुली सुध्दा करण्यात आलेली नाही

त्यामुळे शासन महसुलाची आर्थिक नुकसान झालेले आहे सबब उणीवांची पुर्तता करून अनुपालन सादर करावे.

नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या दि. १०/०९/२००४ च्या परिपत्रकातील परि—३७ अन्वये बॅकेतील मिळालेल्या व्याजाचा हिशोब महानगरपालिका व जिल्हा नागरी विकास यंत्रणानी स्वतंत्र ठेवणे आवश्यक आहे. मात्र या विभागाने याप्रमाणे व्याजाचा हिशोब स्वतंत्रपणे न ठेवता त्याच खात्यावर व्याजाची रक्कम समाविष्ट करून ठेवलेली आहे सदर रक्कमेतुन खर्च करावयाचा झाल्यास राज्य नागरी विकास योजनेच्याा मान्यतेशिवाय तो करता येत नाही मात्र सुवर्ण जयंती नागरी योजनेत अशाप्रकारे व्याजाच्या रक्कमेचा स्वतंत्र हिशोब ठेवलेला नाही त्यामुळे उपरोक्त परिपत्रकाचे उल्लंघन झालेले आहे.

३) रोख पुस्तकाला पृष्ठ क्र. दिलेले नसुन ते शेवटी सक्षम अधिकारी (प्रकल्प अधिकारी) यांचे कडून प्रमाणित केलेले नाही.

महाराष्ट्र शासन निर्णय क्र. एनयुएल /२०१४/प्र.क्र/ १०४/ निवि/ ३३ दि. २८ ऑगस्ट २०१४ नुसार सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेची पुर्नरचना करून त्यांचे राष्ट्रीय नागरी उपजीवीका अभियान (national urban livelihoods mission) दि. १/४/२०१४ पासून रूपांतर करण्यात आलेले आहे.

उल्हासनगर महानगरपालिका अंतर्गत कार्यरत सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेसाठी केंद्र तसेच राज्य शासनाने दिलेले अनुदान व त्यातुन करण्यात आलेल्या खर्चासाठी रोख पुस्तक नगरपालिका लेखा संहिता परिच्छेद क्र.५.३ या प्रपत्रात ठेवण्यात आलेले नाही.

४) सदरील रोख पुस्तकात रोजच्या रोज नोंदी घेवून बंद करणे व त्या दिवसाची अंतिम शिल्लक काढुन ती खाते प्रमुखाने स्वाक्षरीत करणे

आवश्यक आहे तथापी या प्रमाणे सुवर्णजंयती शहरी रोजगार योजनेच्या रोख पुस्तकात रोजच्या रोज नोंदी घेण्यात येत नसल्याचे दिसुन आले ही गंभीर अनियमितता आहे. प्रत्यक्षात ज्या दिवशी खर्च होईल त्याच दिवशी ती उपरोक्त रोखपुस्तकात नोंदविणे आवश्यक आहे. मात्र तसे न करता बॅकेच्या विवरणपत्राप्रमाणे (पासबुक) रोख पुस्तकात नोंदी घेणे ही गंभीर अनियमिता आहे.

## दीनदयाळ अंत्योदय योजना
## राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान
## योजना विभाग

(परिच्छेद क्र. ३५)

**राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान योजना विभागाचे सन २०१३ – २०१४ ते सन २०१६–२०१७ या कालावधीचे लेखापरिक्षण केले असता खालील प्रमाणे अनियमितता दिसून येते.**

१) सन २०१४ – २०१५ मध्ये आरंभीची शिल्लक रक्कम एकुण १,४८,५५,२०६/– शिल्लक असुन एकुण खर्च ९,७७,४०० झालेला आहे व एकुण बॅकेत व्याज ५,९८,७३९/– एवढे जमा झालेले आहे. तरी रोख नोंदवही एकुण १,४४,७६,५४५/– वर्षा अखेरीस एवढया प्रमाणात रक्कम शिल्लक राहील्याचे दिसून आले. सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत सात घटकावर केंद्र. राज्य शासनाने दिलेले अनुदान पुर्णपणे खर्च करणे आवश्यक असून प्रत्येक घटकावरील भौतिक साध्य उदिष्टे हे दारिद्रय निर्मुलन कक्षाचे प्राथमिक कर्तव्य आहे मात्र त्याप्रमाणे उद्‌दीष्टे साध्य न केल्याने संबंधीत दारीद्रये रेषेखाली लाभार्थी लाभापासुन वंचीत राहीलेले आहेत. अखर्चित रक्कम शासनास परत करण्यात आलेली नाही.

काही प्रमाणात प्रमाणकांच्या नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत किंवा त्रृटी आढळुन आल्या आहे.

२) प्रमाणक क्र. ५०९ दि. ३१/३/१५ श्री.भालचंद्र निकम यांना स्वयंरोजगारासाठी रिक्षा खरेदी करणेसाठी रू.२७,४०० अनुदान अदा करण्यात आले परंतू खर्चाचे देयक तयार करण्यात आलेले नाही. तसेच सदर प्रकरण मंजूर करतांना विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात आलेला नाही.

३) प्रमाणक क्र. ७२ दि.०७/१०/१५ राष्ट्रिय नागरी उपजिविका अभियान विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचे मानधन अदा करण्याबाबतचे सादर करण्यात आलेल्या टिपणीमध्ये सर्व कर्मचाऱ्यांची नावे नाहित. तसेच उपस्थिती बाबतचे हजेरी पत्रकात नोंद नाही.अधिकारी व कर्मचारी यांना नेमूण दिलेले उद्दिष्टये व साध्य या कामाबाबतचा अहवाल नाही.

४) प्रमाणक क्र. ८६ दि.०२/१२/१५ राष्ट्रिय नागरी उपजिविका अभियान विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचे नोव्हेंबर २०१५ चे मानधन देण्याबाबतच्या संचिकेमध्ये मार्च,२०१५ चे हजेरी पत्रक लावण्यात आलेले आहे. सदर बाबतीत अनियमितता आढळून येते.

५) कॅशबुकला पृष्ठ क्र. दिलेले नसून ते शेवटी सक्षम अधिकारी (प्रकल्प अधिकरी) यांचेकडून प्रमाणित केलेली नाही.

६) प्रमाणक क्र. ७४ दि.०२/११/१५ कर्मचाऱ्यांचे उद्दिष्ट आणि साध्य याबाबतचा कामाचा अहवाल सादर केल्याचे निर्दशनास येत नाही.

७) सन २०१५ – २०१६ मध्ये आरंभीची शिल्लक रक्कम एकुण १,४४,७६,५४५/–शिल्लक असुन एकुण खर्च २३,६११९१/– झालेला आहे व एकुण बॅकेत व्याज ८०९५००/– एवढे जमा झालेले आहे. तरी रोख नोंदवही एकुण १२९२४८५४/– एवढी शिल्लक असणे आवश्यक असतांना बॅकेने कुठल्या प्रकारचे चार्जेस कपात केले त्याबाबत खुलासा सादर करावा.

वर्षा अखेरीस एवढया प्रमाणात रक्कम शिल्लक राहील्याचे दिसून आले सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत सात घटकावर केंद्र. राज्य शासनाने दिलेले अनुदान पुर्णपणे खर्च करणे आवश्यक असून प्रत्येक घटकावरील भौतिक साध्य उदिष्टे हे दारिद्रय निर्मुलन

कक्षाचे प्राथमिक कर्तव्य आहे मात्र त्याप्रमाणे उद्दीष्टे साध्य न केल्याने संबंधीत दारीद्रये रेषेखाली लाभार्थी लाभापासुन वंचीत राहीलेले आहेत. अखर्चित रक्कम शासनास परत करण्यात आलेली नाही.

काही प्रमाणात प्रमाणकांच्या नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत किंवा त्रृटी आढळुन आल्या त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

८) प्रमाणक क्र. ३१३ दि.१५/०४/२०१५ कर्मचाऱ्यांचे मानधन खर्च रू. २०१४२/– इतकी रक्कम एप्रिल २०१४ मध्ये झालेली असतांना रोख नोंदवहीत सन २०१५–१६ मध्ये घेणेत आलेली आहे.

९) दि.०८/०५/२०१४ ची रू. १६९ व १४/०१/२०१५ ची रू. १६९ बॅंक चार्जेस ची रोख नोंदवहीत सन २०१४–१५ या आर्थिक वर्षामध्ये नोंद घेणे आवश्यक असतांना ती सन २०१५– १६ मध्ये घेण्यात आलेली आहे. सदर

१०) साहित्य खरेदी केल्याचे साठा नोंदवही उपलब्ध करून दिलेली नाही.

## दीनदयाळ अंत्योदय योजना
## राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान
## योजना विभाग

(परिच्छेद क्र.३६)

**राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान योजना विभागाचे सन २०१३ – २०१४ ते सन २०१६–२०१७ या कालावधीचे लेखापरिक्षण केले असता खालील प्रमाणे अनियमितता दिसून येते.**

१) कर्मचारी यांनी बनविण्यात आलेले Daily task sheet वर कोणत्याही सक्षम अधिकाऱ्याने प्रमाणित केलेले नाही.

२) Government of India ministry of Housing and Urban poverty Alleviation यांचे कडील दि. १९/१२/१६ च्या आदेशानुसार राष्ट्रीय नगरी उपजीवीका अभियान या योजनेची पर्नरचना करून त्यांचे दिनदयाल अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान मध्ये रूपांतर करण्यात आलेले आहे.

१) उल्हासनगर महानगरपालिका अंतर्गत कार्यरत सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेसाठी केंद्र तसेच राज्य शासनाने दिलेले अनुदान व त्यातुन करण्यात आलेल्या खर्चासाठी रोख पुस्तक नगरपालिका लेखा संहिता परिच्छेद क्र.५.३ या प्रपत्रात ठेवण्यात आलेले नाही.

२) सदरील रोख पुस्तकात रोजच्या रोज नोंदी घेवून बंद करणे व त्या दिवसाची अंतिम शिल्लक काढुन ती खाते प्रमुखाने स्वाक्षरीत करणे आवश्यक आहे तथापी या प्रमाणे सुवर्णजंयती शहरी रोजगार योजनेच्या रोख पुस्तकात रोजच्या रोज नोंदी घेण्यात येत नसल्याचे दिसुन आले ही गंभीर अनियमितता आहे. प्रत्यक्षात ज्या दिवशी खर्च होईल त्याच दिवशी ती उपरोक्त रोखपुस्तकात नोंदविणे आवश्यक आहे. मात्र तसे न करता बॅकेच्या विवरणपत्राप्रमाणे (पासबुक) रोख पुस्तकात नोंदी घेणे ही गंभीर अनियमितता आहे.

३) सन २०१६ – २०१७ मध्ये आरंभीची शिल्लक रक्कम एकुण १,२९,२४,८५४/– शिल्लक असुन एकुण खर्च रू. ३८,१६,७९३/– झालेला आहे व एकुण बॅंकेत व्याज रू. ७,७९,६३५/– एवढे जमा झालेले आहे. तरी रोख नोंदवही एकुण ९८,८७,६९६/– एवढी शिल्लक असणे आवश्यक असतांना बॅंकेने कुठल्या प्रकारचे चार्जेस कपात केले त्याबाबत खुलासा सादर करावा.

माहे मार्च २०१७ मधिल रोख नोंद वहीतील अखेरची शिल्लक रू.९८,८७,६९६/– असून व बॅंकेतील पासबुक तपासले असता पास बुकातील अंतिम शिल्लक रू. १०,०१,२९६/– अशी आहे एकुण रू. १,२५,२३०/– फरक असा दिसून येतो.

वर्षा अखेरीस एवढया प्रमाणात रक्कम शिल्लक राहील्याचे दिसून आले सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत सात घटकांवर केंद्र. राज्य शासनाने दिलेले अनुदान पुर्णपणे खर्च करणे आवश्यक असून प्रत्येक घटकावरील भौतिक साध्य उदिष्टे हे दारिद्रय निर्मुलन कक्षाचे प्राथमिक कर्तव्य आहे मात्र त्याप्रमाणे उद्दीष्टे साध्य न केल्याने संबंधीत दारीद्रये रेषेखाली लाभार्थी लाभापासुन वंचीत राहीलेले आहेत. अखर्चित रक्कम शासनास परत करण्यात आलेली नाही.

४) काही प्रमाणात प्रमाणकांच्या नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत किंवा त्रृटी आढळुन आल्या त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

१) प्रमाणक क्र. १५६ दि.०३/०५/२०१६ रक्कम रू. ५२४० इतक्या रकमेचे मानधना बाबतचे खर्चाचे देयक उपलब्ध करून दिलेले नाही. सदरची बाब गंभिर आहे.

मुख्य लेखा परिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

## प्रभाग कार्यालय

(परिच्छेद क्र.३७)

**प्रभाग कार्यालय विभागाचे सन २०१३–१४ ते सन १६–१७ पर्यंतचे लेखापरिक्षण केले असता खालील अनियमितता दिसून आली**

**विषयः— प्रभाग कार्यालय क्र.१ मधील अंतर्गत लेखापरीक्षणातील अनियमिततेबाबत.**

सन २०१४–१५ याआर्थिक वर्षाचे लेखा परीक्षण केले असता पावती पुस्तकांची साठा नोंदवही लेखापरीक्षणास प्राप्त न झाल्याने प्रत्यक्षात किती पावती पुस्तके मुख्यालयाकडून प्रभाग कार्यालयात प्राप्त झाली. किती पावती पुस्तके वापरण्यात आली व किती पावती पुस्तके शिल्लक याबाबतचा ताळमेळ घेता आला नाही.

महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम १९८८ मधील कलम १४ नुसार विवाह नोंदणी ठेवणे आवश्यक आहे. सदर नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने तपासणी करता आली नाही. माहे मार्च २०१५ मध्ये विवाह नोंदणी केलेली प्रकरणे लेखापरिक्षणास प्राप्त झाली नाही.

# प्रभाग कार्यालय

(परिच्छेद क्र.३८)

**प्रभाग** कार्यालय **विभागाचे सन २०१३—१४ ते सन १६—१७ पर्यंतचे** लेखापरिक्षण **केले असता खालील अनियमितता दिसून आली**

**विषय:—प्रभाग कार्यालय क्र.२ मधील अंतर्गत** लेखापरीक्षणातील **अनियमिततेबाबत.**

सन २०१४—१५ याआर्थिक वर्षाचे लेखा परीक्षण केले असता पावती पुस्तकांची साठा नोंदवही लेखापरीक्षणास प्राप्त न झाल्याने प्रत्यक्षात किती पावती पुस्तके मुख्यालयाकडून प्रभाग कार्यालयात प्राप्त झाली. किती पावती पुस्तके वापरण्यात आली व किती पावती पुस्तके शिल्लक याबाबतचा ताळमेळ घेता आला नाही.

महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम १९८८ मधील कलम १४ नुसार विवाह नोंदणी ठेवणे आवश्यक आहे. सदर नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने तपासणी करता आली नाही. माहे मार्च २०१५ मध्ये विवाह नोंदणी केलेली प्रकरणे लेखापरिक्षणास प्राप्त झाली नाही.

# प्रभाग कार्यालय

(परिच्छेद क्र.३९)

**प्रभाग कार्यालय विभागाचे सन २०१३—१४ ते सन १६—१७ पर्यंतचे** लेखापरिक्षण **केले असता खालील अनियमितता दिसून आली**

**विषयः— प्रभाग कार्यालय क्र.३ मधील अंतर्गत लेखापरीक्षणातील अनियमिततेबाबत.**

सन २०१४—१५ याआर्थिक वर्षाचे लेखा परीक्षण केले असता पावती पुस्तकांची साठा नोंदवही लेखापरीक्षणास प्राप्त न झाल्याने प्रत्यक्षात किती पावती पुस्तके मुख्यालयाकडून प्रभाग कार्यालयात प्राप्त झाली. किती पावती पुस्तके वापरण्यात आली व किती पावती पुस्तके शिल्लक याबाबतचा ताळमेळ घेता आला नाही.

महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम १९८८ मधील कलम १४ नुसार विवाह नोंदणी ठेवणे आवश्यक आहे. सदर नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने तपासणी करता आली नाही. माहे मार्च २०१५ मध्ये विवाह नोंदणी केलेली प्रकरणे लेखापरिक्षणास प्राप्त झाली नाही.

# प्रभाग कार्यालय

(परिच्छेद क्र.४०)

**प्रभाग कार्यालय विभागाचे सन २०१३–१४ ते सन १६–१७ पर्यंतचे लेखापरिक्षण केले असता खालील अनियमितता दिसून आली**

**विषय:–प्रभाग कार्यालय क्र.४ मधील अंतर्गत**
लेखापरीक्षणातील अनियमिततेबाबत.

सन २०१४–१५ याआर्थिक वर्षाचे लेखा परीक्षण केले असता पावती पुस्तकांची साठा नोंदवही लेखापरीक्षणास प्राप्त न झाल्याने प्रत्यक्षात किती पावती पुस्तके मुख्यालयाकडून प्रभाग कार्यालयात प्राप्त झाली. किती पावती पुस्तके वापरण्यात आली व किती पावती पुस्तके शिल्लक याबाबतचा ताळमेळ घेता आला नाही.

महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम १९८८ मधील कलम १४ नुसार विवाह नोंदणी ठेवणे आवश्यक आहे. सदर नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने तपासणी करता आली नाही. माहे मार्च २०१५ मध्ये विवाह नोंदणी केलेली प्रकरणे लेखापरिक्षणास प्राप्त झाली नाही.

**मुख्य लेखा परिक्षक**
**उल्हासनगर महानगरपालिका**

# सार्वजनिक आरोग्य विभाग

(परिच्छेद क्र.४१)

**सार्वजनिक आरोग्य विभागाचे सन २०१३—१४ व सन २०१६—१७ चे लेखापरिक्षण सुरू केले असता खालील अनियमितता दिसून येते.**

**विषय:—२०१४—१५ मध्ये जंतूनाशक/किटकनाशक/ अळीनाशक डासनाशक औषधे खरेदीवर केलेल्या खर्चातील अनियमिततेबाबत .**

उल्हासनगर महानगरपालिका आरोग्य विभाग अंतर्गत घनकचरा विभागने जंतुनाशक/ किटकनाशक/अळीनाशक/ डासनाशक औषधे खरेदी केले आहे. २०१४—१५ मधील सदरील औषधे खरेदीमध्ये ब्लीचींग पावडर, काळे फिनाईल, सफनिटेक्स व्हाईट ल्किनर, जर्मीटॉक्स प्लस पावडर, प्रोडेन्टीसाईड झिंक रिप बेट, बायोक्लचर, बायोसोल ५०टक्के इसी वगैरे असे २७ प्रकारचे औषधे खरेदीसाठी शासनाने वेळोवेळी दर करारनुसार औषधे खरेदी करण्याचे निर्देश दिलेले आहेत. परंतु घनकचरा विभागाने जंतुनाशक/किटकनाशक/अळीनाशक /डासनाशक औषधे खरेदीसाठी शासनाचे दर करारनुसार किंवा प्रचलित दरानुसार बाजारभाव दर मागवून तसा अंदाजित खर्च निश्चित करून त्याप्रमाणे निविदा मागविणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही झालेली नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील नियम ७४(२)नुसार किफायतशीर असलेली निविदा स्विकारणे आवश्यक आहे. परंतू दरकरापेक्षा खरेदी किफायतीशीर झाली असल्याबाबत खात्री न करता जाहिर निविदा प्रसिध्द करून खरेदी करण्यात आली आहे.

**मुख्य लेखा परिक्षक**
**उल्हासनगर महानगरपालिका**

# सार्वजनिक बांधकाम विभाग

(परिच्छेद क्र.४२)

**सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन २०१३–१४ ते सन १६–१७ पर्यंतचे लेखापरिक्षण केले असता खालील अनियमितता दिसून आली**

**विषयः–निर्मल एम.एम.आर.डी योजना अंतर्गत केलेल्या कामाबाबत अभिलेखे उपलब्ध करून न दिले बाबत.**

सदर सार्वजनिक बांधकाम विभागाने लेखापरीक्षण करणेसाठी अभिलेखे तपासणीस उपलब्ध करून दिले नाही.

निर्मल एम.एम.आर.डी. योजना

१) योजनेचा मंजूर ठराव व इतर दस्ताऐवज

२) प्रशासकीय मंजुरी व अंदाजपत्रक

३) तांत्रिक मंजुरी व त्यासंबंधातील दरसुची दर पृथकरणे

४) एम.एम.आर.डी. यांची मंजुरी व त्याअनुषंगाने योजनेचे दस्ताऐवज

५) निविदा नस्ती, निविदा एम.एम.आर.डी.अटी व शर्ती, प्राप्त निविदा, निविदा मंजुरी प्रस्ताव, निविदा मंजुरी ठराव, त्या अनुषंगाचे दस्ताऐवज

६) कार्यदेश व करारनामे त्या अनुषंगाने दस्ताऐवज

७) सुधारित प्रशासकीय मंजुरी व सुधारीत तांत्रिक मंजुरी व त्या संबंधित जिल्हा दरसुची पत्रक व पृथकरणे त्या अनुषंगाने दस्ताऐवज

८)सुधारित निविदा नस्ती फी, निविदा अटी शर्ती, प्राप्त निविदा मंजुरी प्रस्ताव निविदा मंजुरी ठराव त्या अनुषंगाचे दस्तऐवज

९) सुधारित कार्यादेश व सुधारित करारनामा, सुधारित ठरावाची प्रत

१०) एम.एम.आर.डीकडून प्राप्त अनुदाने कर्जे यांचा तपशिल त्यानुसार पाठविलेली उपयोगिता प्रमाणपत्र योजनेची रोखवही.

११) वेळोवेळी एम.एम.आर.डी. यांना कामाचा अहवाल पाठविलेबाबत पत्रके, त्यांचा दस्तऐवज

# सार्वजनिक बांधकाम विभाग

(परिच्छेद क.४३)

**सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन २०१३—१४ ते सन १६—१७ पर्यंतचे लेखापरिक्षण केले असता खालील अनियमितता दिसून आली**

**विषयः—सार्वजनिक बांधकाम विभागातील लेखे उपलब्ध करून न दिले बाबत.**

बांधकाम विभागाचे २०१३—१४ व २०१४—१५ या वर्षाचे लेखा परीक्षणासाठी खालील नमूद माहिती व लेखे लेखा परीक्षणास उपलब्ध करून देणे बाबत.

१) बी.एस.यु.पी.अंतर्गत शासनातर्फे २०१३—१४ व २०१४—१५ उपलब्ध झालेले अनुदान व सदर वर्षात झालेला एकूण खर्च तसेच अखर्चित अनुदान शिल्लक असल्यास असे अनुदान शासनास परत केले अशा रक्कमांचा तपशील.

२) आमदार/खासदार निधी अंतर्गत शासनाकडून एकूण प्राप्त झालेले अनुदान २०१३—१४ व २०१४—१५मध्ये खर्च करण्यात आलेली रक्कम सदर वर्षात शिल्लक असलेल्या अनुदानाची रक्कम शिल्लक अथवा अशी शिल्लक रक्कम पुढील वर्षात वापरणेत आली असल्यास अशा रक्कमेचा तपशील.

३) विविध शासन योजनेअंतर्गत प्राप्त झालेले अनुदान खर्च व शिल्लक रक्कमांचा योजनानिहाय तपशील.

४) विविध लेखा शिर्षाखाली अंदाजपत्रकानुसार बांधकाम विभागास प्राप्त झालेली तरतुद व त्या अनुषंगाने झालेला खर्च याबाबतची तरतुद नोंदवही व शिल्लक तरतुदींचा लेखाशिर्षानिहाय तपशील.

५) सार्वजनिक बांधकाम विभागाकडील २०११–१२ ते २०१३–१४ पर्यंतच्या जिल्हा दरसूची (D.S.R.)बांधकाम विभागाकडील दरसूचीनुसार प्रत्येक बाबींचे केलेले दर पृथ्थकरण (रेट अॅनालिसेस) वरील सर्व लेखे, कागदपत्रे व माहिती दिलेली नाही.

मुख्य लेखा परिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

# भांडार विभाग

(परिच्छेद क्र. ४४)

**भांडार विभागाचे सन २०१३–१४ व सन २०१६–१७ चे लेखापरिक्षण सुरू केले असता खालील अनियमितता दिसून येते.**

**विषयः— महानगरपालिकेत क व ड लाभार्थी कर्मचाऱ्यांच्या गणवेष कापड खरेदीतील अनियमिततेबाबत**

गणवेष कापड खरेदीची निविदा जाहीरात ही स्थानिक वृत्तपत्र दैनिक अमृत कलश व दैनिक मुंबई लक्षदीप यात दि.०२/०१/१९९२ मधील परिच्छेद क्र. १०.८ अन्वये निविदा संबंधी जाहीरात ही एक राज्यस्तरीय वृत्तपत्रात प्रसिध्द करणे बंधनकारक आहे. तसेच शासन निर्णय दि. ०२/०१/१९९२ मधील परिच्छेद क्र.८.१ अन्वये खरेदी समितीची स्थापना करणे आवश्यक आहे. परंतु सदर गणवेष कापड खरेदीची जाहीरात राजपत्रात प्रसिध्द न करता स्थानिक वर्तमान पत्रात देण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासन उदयोग, उर्जा व कामगार विभाग शा. नि.क्र. भाखंस १०८८/२५१२/उदयोग ६ दि. ०२/०१/१९९२ परिच्छेद मधील परिशिष्ट—५ मध्ये नमुद केल्याप्रमाणे तसेच शासन पत्र क्र. संकीर्ण—२००५/४६/प्र.क्र.३/०६नवि—२० दि. ३१/०७/२००६ नुसार गणवेषाचे कापड महाराष्ट्र राज्य वस्त्रोउदयोग महामंडळ/महाटेक्स/टेक्सकॉम/महाराष्ट्र राज्य यंत्रमार्ग महामंडळ यांचेकडून मागणी नोदवून खरेदी करणे बंधकारक आहे. परंतु अशी कारवाई झालेली नाही.

उदयोग, उर्जा व कामगार विभाग शा. नि.क्र.भाखंस १०८८/२५१२/उदयोग ६ दि. ०२/०१/१९९२ मधील परिच्छेद ८.४ मधिल तरतुदीनुसार खरेदी केलेले कापड विहित दर्जाचे पुरवल्याबाबत महाराष्ट्र राज्य वस्त्रोउदयोग महामंडळ / महाटेक्स/टेक्सकॉम/महाराष्ट्र राज्य यंत्रमार्ग महामंडळ यांचेकडून तपासणी करून तसा तपासणी अहवाल ठेवणे आवश्यक आहे. परंतु तशी तपासणी केलेली दिसुन येत नाही. तसेच विहित दर्जाचे कापड पुरवठा केल्याची खात्री होत नाही.

तरी वरिल आक्षेपांची पुर्तता करून पुर्तता अहवाल त्वरीत लेखापरिक्षण विभागास सादर करावा.

# भांडार विभाग

(परिच्छेद क्र. ४५)

**भांडार विभागाचे सन २०१३—१४ व सन २०१६—१७ चे लेखापरिक्षण सुरू केले असता खालील अनियमितता दिसून येते.**

**विषयः—भांडार विभागातील कॅश बुक, स्टेशनरी रजिस्टर,साठा नोंद वही तपासली असता खालिल अनियमितता दिसून येते.**

१) भांडार विभागातील कॅश बुकमध्ये पृष्ठ क्रमांक दिलेले नाहीत. तसेच सक्षम अधिकारी कॅशबुक यांचेकडून प्रमाणित करून घेतलेले नाही.

भांडार विभागातील निरूपयोगी साहित्याची विक्री केल्याचे रू. २५०००/— लेखा विभागात दि. २१/१२/२०१३ रोजी जमा केल्याचे दिसते परंतू सदर रक्कम जमा केल्याचे चलन लेखा परिक्षण पथकास उपलब्ध करून दिलेले नाही.

२) साहित्य वितरण(वाटप) रजिस्टर मध्ये वर्षअखेर मागिल वर्षाचा एकुण साहित्य साठा तसेच एकुण साहित्याचे झालेले वाटप व शिल्लक राहिलेल्या वस्तूंच्या नोंदीचा गोषवारा करण्यात आलेला नाही.

३) सन २०१३—१४ या आर्थिक वर्षात छपाई साहित्य या रजिस्टर मध्ये मागिल वर्षाच्या अखेरची साहित्य शिल्लकची नोंद नाही. आरंभिच्या साहित्याची नोंद नाही. अखेरची शिल्लक किती याची नोंद घेतलेली नाही. गोषवारा काढलेला नाही.

४) वर्षाअखेर राहिलेल्या शिल्लक साहित्याची नोंद ही दुसऱ्या वर्षात आरंभीची शिल्लक म्हणून नोंद घेणे आवश्यक असतांना त्याची नोंद घेतल्याचे दिसून येत नाही. स्टेशनरी रजिस्टर, साहित्य वाटप रजिस्टर, साठा नोंद वही यांना नंबरींग करून प्रमाणित केलेले नाही.

५)वर्ष अखेरीस पावती पुस्तकांची आरंभीची शिल्लक किती व वाटप किती व वर्ष अखेरीस पावती पुस्तकांची शिल्लक किती यांचा गोषवारा काढलेला नाही. किती पावती पुस्तकांची छपाई केली व कोणत्या विभागांना वाटप केले व किती पावती पुस्तके शिल्लक आहेत याचा गोषवारा नाही.

६) स्टेशनरी रजिस्टर  नमुना नं ११६ स्टॉक बुक मध्ये प्रारंभी शिल्लक व मिळालेल्या वस्तूंची संख्या कोणाला किंवा कोणत्या प्रयोजनासाठी दिले दिनांक सही व स्वाक्षरी नमूद करणे आवश्यक असतांना तशी नोंद घेण्यात आलेली नाही. तसेच शिल्लक साठा नमूद केलेला नाही.

७) वाटप रजिस्टर दुसरे केल्याचे आढळून आलेले आहे. स्टॉक नोंद रजिस्टर व वाटप नोंद रजिस्टर असे दोन वेगवेगळे ठेवण्याचे प्रयोजन काय? बऱ्याच वस्तूंच्या नोंदीमध्ये आरंभीची शिल्लक, प्राप्त साठा व वाटप तसेच अखेरची शिल्लक यामध्ये बऱ्याच प्रामाणात तफावत निदर्शनास आली आहे.

<u>उदा.</u>

<u>कॅल्क्युलेटर</u>:— या साहित्याची स्टॉक रजिस्टर मध्ये एकुण शिल्लक साठा ५६ दिसून येत असतांना वाटप रजिस्टर नोंद मध्ये सन १३.१४ अखेर ०६ कॅल्क्युलेटर शिल्लक असल्याचे आढळून आलेले आहेत.

**<u>कप आणि डिनर सेट :—</u>** या साहित्याची प्राप्तची नोंद स्टॉक बुक नोंद वहीत नसतांना वाटप केल्याची नोंद आहे.

शिल्लक —०६  वाटप —२६ अशी अनियमितता दिसून येते.

**<u>डस्टर कॉटन:—</u>** आरंभी शिल्लक १७३ प्राप्त ३०० एकुण ४७३ वाटप ३०१ अखेरची शिल्लक १७२ असे असतांना वाटप नोंद रजिस्टर मध्ये शिल्लक साठयाची नोंद नाही.

# भांडार विभाग

(परिच्छेद क्र. ४६)

**भांडार विभागाचे सन २०१३–१४ व सन २०१६–१७ चे लेखापरिक्षण सुरू केले असता खालील अनियमितता दिसून येते**

**.विषय:— भांडार विभागातील साहित्य वाटप नोंद वही, बजेट कंट्रोल रजिस्टर तपासले असता खालिल अनियमितता दिसून येते.**

१) सन २०१३.१४ मध्ये दैनंदिन छपाई साहित्य वाटप नोंद वही क्र.३ या नोंद वहिमध्ये नोंदवण्यात आलेल्या वस्तू (आर्टिकल— स्टेशनरी वस्तू) पृष्ठ क्र. १ते १०३ अनु क्र. १ ते ६९ साठी स्वतंत्र साठा नोंद वहि ठेवण्यात आलेली नाही.

दैनंदिन छपाई साहित्याचे साठा नोंद वहि न ठेवता वाटप नोंदवही ठेवण्यात आलेली आहे. त्यामुळे दैनंदिन छपाई साहित्याचा साठा किती आहे याची नोंद नाही.

Form No- 111 Material issue Register (साधन सामुग्री) नोंद घेणे

Form No- 116 Stationery (साहित्य) नोंद घेणे

गणवेश किट, गमबुट, गणवेशा सोबतचे साहित्य Form No- 111 या नमूना नोंदवहि मध्ये नोंद घेतलेली आहे.

Form No- 111:— **नियम नं. १४२(२), १५०(१) व १८३(३)**

Form No- 116 :—नियम १४५(१)३ १४५, १५०(४) व १५३

२) बजेट कंट्रोल रजिस्टर पृष्ठांकन करून प्रमाणित केलेले नाही. बिल रजिस्टर पृष्ठ क्रमांक देवून प्रमाणित केलेले नाही.

बिल रजिस्टर मध्ये अनु क्र. ११० पासूनच्या पुढच्या बिलांची नोंद नाही. सदर बिल नोंद वहिमध्ये दि. १८/०१/२०१४ पर्यंतच्याच नोंदीची नोंद घेतल्याचे दिसून आल्यात. त्या पुढच्या बिलांच्या नोंदी रजिस्टर मध्ये

नमूद करण्यात आलेल्या नाहीत. सदरच्या कालावधीची देयके उपलब्ध असतांना नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

**उदा.**

अनु क्र. २३२ – ३०/३/२०१३ रक्कम रू.३,१४,८५०/–

अनु क्र. १८२– ५/३/२०१४ रक्कम रू.६७५००/–

अनु क्र. १८३ – ५/३/२०१४ रक्कम रू.६,६००/–

सदर बिलांच्या नोंदी मध्ये अनियमितता आढळून आलेली दिसून येते.

३) दि. २४/६/२०१६ पुस्तक क्र. १८८८ पावती क्र. १८८७०३ रक्कम रू. ६००/– असताना रोख नोंदवही व चलन या मध्ये रू. १००/– ची लेखा विभागात नोंद घेण्यात आलेली आहे.

सदरची रोख नोंद वही तपासली असता दि. २९/१२/२०१४ सदरची रोख नोंद वही जाने २०१० पासून नोंद करणे आवश्यक असतांना नोंदी केलेल्या नाही.

४) सदरील साहित्य वितरण(वाटप) रजिस्टर मध्ये वर्षअखेर मागिल वर्षाचा एकुण साहित्य साठा तसेच एकुण साहित्याचे झालेले वाटप व शिल्लक राहिलेल्या वस्तूंच्या नोंदीचा गोषवारा करण्यात आलेला नाही.

५) बऱ्याच वस्तूंच्या नोंदीमध्ये आरंभीची शिल्लक प्राप्त साठा व वाटप तसेच अखेरची शिल्लक यामध्ये बऱ्याच प्रामाणात तफावत निदर्शनास आली आहे.

**उदा.**

**ग्लास:–** सन २०१३–१४ मधिल ग्लास एकुण २३८ नग शिल्लक असतांना सन २०१४–१५ या वर्षामध्ये आरंभीची शिल्लक दाखवण्यात आलेली नाही.

**नेमबोर्ड चेंबरर्स:–** हया वस्तू स्टॉक बुकमध्ये निल दाखविण्यात आले असतांना वाटप नोंद रजिस्टर मध्ये १९ दाखविण्यात आलेले आहे.

**पॉलिथिन बॅग इलेक्शन:—** आरंभीची शिल्लक ४१३ प्राप्त निरंक वाटप ०३ अखेर शिल्लक निरंक अशी तफावत दिसून येत असतांना त्याचा गोषवारा काढलेला नाही.

**व्हाईट लेस:—** आरंभीची शिल्लक ६९९५, प्राप्त २०००, वाटप १५८४, अखेर शिल्लक निरंक अशी तफावत दिसून येत असतांना त्याचा गोषवारा काढलेला नाही.

**स्टॅपलर पिन (२४/१६):—** आरंभीची शिल्लक २८३७ प्राप्त निरंक वाटप १३९ अखेर शिल्लक निरंक अशी तफावत दिसून येत असतांना त्याचा गोषवारा काढलेला नाही. मगील वर्षाची शिल्लक पुढील वर्षाच्या आरंभीच्या शिल्लक मध्ये नोंद घेतलेली नाही. ६) दि. ११/१/२०१६ रोजी मे. मोहित इंटरप्राईजेस उल्हासनगर. ३ यांना जुन्या वर्तमान पत्राची विक्री केलेली असलेली रक्कम रूपये १४,४९०/— लेखा विभागात जमा कल्याचे चलन उपलब्ध करून दिलेले नाही.

७) सन २०१५—१६ या आर्थिक वर्षात छपाई साहित्य या रजिस्टर मध्ये मागिल वर्षाच्या अखेरची साहित्य शिल्लकची नोंद नाही. आरंभिच्या साहित्याची नोंद नाही. अखेरची शिल्लक किती याची नोंद घेतलेली नाही. गोषवारा काढलेला नाही.

८) रोख नोंद वहीमध्ये लिपिक/विभाग प्रमुखाचे रोख जमा केल्याचे दिनांका सहित स्वाक्षरी केलेली नाही.

९) पावती पुस्तक क्र.१८८८ पावती क्र.१८८७४७ रक्कम रू.४०/ दि. १७/०१/१७ ची असताना लेखा विभागात दि. १५/९/२०१७ रोजी भरणा केल्याचे दिसून आले. सदर बाबतीत अनियमितता आढळून येते.

१०) सन २०१६—१७ या आर्थिक वर्षात छपाई साहित्य या रजिस्टर मध्ये मागिल वर्षाच्या अखेरची साहित्य शिल्लकची नोंद नाही.

आरंभिच्या साहित्याची नोंद नाही. अखेरची शिल्लक किती याची नोंद घेतलेली नाही. गोषवारा काढलेला नाही.

तरी वरिल आक्षेपांची पुर्तता करून पुर्तता अहवाल त्वरीत लेखापरिक्षण विभागास सादर करावा.

**मुख्य लेखा परिक्षक**
**उल्हासनगर महानगरपालिका**

# कर विभाग

(परिच्छेद क्र.४७)

**कर विभागाचे सन २०१३–१४ ते सन १६–१७ पर्यंतचे लेखापरिक्षण केले असता खालील अनियमितता दिसून आली**

**विषयः—कर विभागातील मिळकतीची आकारणी चुकीची केल्याबाबत**

कर विभागाचे लेखा परीक्षण केले असता सन १९९६–९७ नंतर अदयापपर्यंत नवीन कर आकारणी पुस्तक तयार करण्यात आले नाही. अर्जासोबत वाणिज्य वापरापृष्ठयर्थ कोणतही अभिलेख जोडलेले नाही. कमी क्षेत्रफळाच्या जागेची कर आकारणी केली आहे. स्थळ पाहणी अहवाल कर निर्धारण व संकलक यांनी साक्षांकित केलेला नाही. कर आकारणी विलंबाने केली आहे. भाडेवाढ न केल्याने जुन्याच भाडेनुसार कर आकारणी चालू आहे. कर आकारणी नोंदवहीत संबंधीत लिपिक, कर निरीक्षक, कर निर्धारक यांची स्वाक्षरी नाही. कर निरीक्षकांचा स्थळ पाहणी अहवाल नाही. कर आकारणी नोंदवहीत कराची परिगणना केलेली नाही. संबंधित प्रकरणांच्या मुळ नस्ती तपासणीकरीता अप्राप्त आहेत. कर आकारणी नोंदवहीतील नोंदी व संगणकात नोंद केल्यानंतरच्या नोंदीची पुर्नतपासणी केलेली नाही. नियम २६७(अ) प्रमाणे शास्ती आकारणी केली जात नसल्याचे निदर्शनास आले आहे.

# कर विभाग

(परिच्छेद क्र.४८)

**कर विभागाचे सन २०१३–१४ ते सन १६–१७ पर्यंतचे लेखापरिक्षण केले असता खालील अनियमितता दिसून आली**

**विषयः– कर विभागातील मालमत्ता कराच्या थकबाकीबाबत**

कर विभागाचे लेखा परीक्षण केले असता सदर बाबी निदर्शनास आले बाबत.

१) थकबाकीदारांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम २०४९ मधील प्रकरण ८ कराधान नियम ४२ ते ४८ नुसार नोटीस पाठवणे, मालमत्ता ताब्यात घेणे/जप्त करणे लिलाव करणे तसेच कर आकारणी प्रकरणांचे बाबत मोजमापे घेवून हरकती मागवून बिले पाठविण्याची कामे वेळीच न झाल्याने आकारणी/मागणी करणे इत्यादी सारखी कामे महानगरपालिका कर विभागाने त्या त्या वित्तीय वर्षात वेळीच केलेली नाहीत कर वसुली संदर्भात अशी कारवाई न केल्याने वसुलीचे प्रमाण कमी होऊन महानगरपालिकेच्या महसुली उत्पन्नात घट झाली आहे.

२) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार मोकळया जागांवर कर आकारणी करणेचे आहे. महानगरपालिका क्षेत्रात अशा मोकळया जागा–जमिनी असल्याचे अभिलेखे व अशा मालमत्तांवर कर आकारणी, मागणी व वसुलीचे लेखे लेखा परीक्षणास उपलब्ध झाले नाही.

# कर विभाग

(परिच्छेद क्र.४९)

**कर विभागाचे सन २०१३–१४ ते सन १६–१७ पर्यंतचे लेखापरिक्षण केले असता खालील अनियमितता दिसून आली**

**विषयः–कर विभागातील करनिर्धारण व संकलन विभागाकडील अभिलेखे विहीत नमुन्यात ठेवले नसलेबाबत.**

कर निर्धारण व संकलन विभागाकडिल अभिलेखे विहीत नमुन्यात ठेवलेले नाही.

१) वसुली नोंदवही.

२) दैनिक वसुली गोषवारा.

३) मागणी नोंदवही.

४) मागणी बिल नोंदवही.

५) बिलांचे गोषवारा विवरणपत्र.

६) नोटीस फी, वॉरंट फी व इतर नोंदवही.

७) नोटीस फी, वॉरंट फी व इतर गोषवारा विवरणपत्र.

८) परतावा remission व write off नोंदवही.

९) परतावा remission गोषवारा विवरणपत्र.

१०) काढून टाकलेल्या मालमत्ताचे गोषवारा विवरणपत्र.

११) दरवाढीचे गोषवारा विवरणपत्र.

१२) मागणी व वाढीचे जुळवणी गोषवारा विवरणपत्र.

१३) वर्षानुसार सारांश विवरणपत्रे, मालमत्ता व इतर करांचे लेखाशिर्षानुसार जमा विवरणपत्रे.

१४) परतावा व सवलतीचे सारांश विवरणपत्र.

१५) वाढ व घट नोंदवही.

# कर विभाग

(परिच्छेद क्र.५०)

**मालमत्ता कर विभागाचे सन २०१३–१४ ते २०१६–१७ पर्यंतचे** लेखापरिक्षण **सुरू केले असता खालील अनियमितता दिसून येते.**

१)मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमा नुसार महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या अधिकारा नुसार ५वर्षातून एकदा तरी आकारणी पुस्तक तयार करणे आवश्यक आहे अशी तरतूद आहे. तसेच उल्हासनगर महानगरपालिका महासभा ठरावानुसार सन १९९६–९७ नंतर आजतागायत नविन कर आकारणी पुस्तक तयार करण्यात आले नाही.

२)मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमानुसार अनधिकृत बांधकामावर शास्ती आकारणी केली जात नसल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच सदर शास्तीची रक्कम परिगणना करून मिळकत धारकाकडून वसूल केल्याचे दिसून येत नाही.

३)मालमत्ता कर विभागाकडून निवासी वापरातून वाणिज्य वापरात कराचे रूपांतर करतांना वाणिज्य वापराच्या पृष्ठयार्थ कागदपत्रे मिळकतीच्या मालकाकडून घेणे आवश्यक असतांना तसे न घेता मिळकतीच्या वापरात बदल मंजूर केल्याचे दिसून येते.

४)कर आकारणी नोंदवहि तपासलि असता खालील प्रमाणे त्रृटी आढळुन आल्या

१)सबंधित लिपिक, करनिरिक्षक, करनिर्धारक यांची स्वाक्षरी दिसून येत नाही.

२)करनिरिक्षकांचा स्थळपाहणी अहवाल दिसून येत नाही.

३)कर आकारणी नोंदवहितील नोंदी अपूर्ण असल्याचे दिसून येते.

४)कर आकरणी नोंदवहित कराची परिगणना केल्याचे दिसून येत नाही.

५)करआकारणी नोंदवहितील नोंदी व संगणकात नोंद केल्यानंतरच्या नोंदिची पुर्णतपासणी केल्याचे दिसून येत नाही.

५)मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमानुसार थकबाकीदारांना नोटीसा पाठविणे मालमत्ता ताब्यात घेणे/जप्त करणे/लिलाव करणे तसेच कर आकारणी प्रकरणांचे बाबत मोजमापे घेवून हरकती मागवून देयके पाठविण्याची कामे वेळीच न झाल्याने आकारणी/ मागणी करणे इ. कामे करनिर्धारण व संकलन या विभागाकडून त्या त्या वित्तिय वर्षात वेळीच केल्याचे दिसून येत नाही.

६)महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी नुसार मोकळया जागांवर कर आकारणी मालमत्ता कर या विभागाकडून करण्यात आल्याचे दिसून येत नाही.

७)मालमत्ता विभागात विहित नमुन्यात नोंदवहया नोंदवल्याचे दिसून येत नाही.

१)वसूली नोंदवहि (नमुना सर्वसा—११)

२)दैनिक वसूली गोषवारा (नमुना सर्वसा—१२)

३)मागणी नोंदवहि (नमुना सर्वसा—२०)

४)मागणी बिल नोंदवहि (नमुना सर्वसा—२१)

५)बिलांचे गोषवारा विवरण पत्र (नमुना सर्वसा—२२)

६)नोटीस फि, वॉरंट फि व इतर नोंदवहि (नमुना सर्वसा—२३)

७)नोटीस फि, वॉरंट फि व इतर गोषवारा विवरण पत्र (नमुना सर्वसा—२४)

८)परतावा, remssion व write off नोंदवहि (नमुना सर्वसा—२५)

९)परतावा, remssion व write off विवरण पत्र

काढून टाकलेल्या मालमत्तेचे गोषवारा विवरण पत्र(नमुना सर्वसा—२६तसेच याव्यतिरिक्त)

१०)दरवाढीचे गोषवारा विवरण पत्र (नमुना P&OT-1)

११)मागणी व दरवाढीचे जुळवणी गोषवारा विवरण पत्र (नमुना P&OT-2)

१२)वर्षानुसार सारांश विवरणपत्रे मालमत्ता व इतर करांचे लेखाशिर्षानुसार जमा विवरणपत्रे (नमुना P&OT-3)

१३)परतावा व सवलतीचे सारांश विवरणपत्र

१४)वार्ड व गट नोंदवही

वरिल प्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेतील मालमत्ता कर विभागाकडील अभिलेख अदयावत ठेवले नसल्याचे निर्दशनास आले आहे.

८)मालमत्ता कर विभागाकडून मालमत्ता कर वसूल केले जाते यासाठी भांडार विभागातून छापील पावती पुस्तकांचा वापर करून आकारण्यात आलेले कर वसूल केले जाते. पावती पुस्तकांचा वापर बंद करून, ई – पेमेंट वसूल करण्यात यावा जेणे करून महापालिकेचा स्टेशनरी खर्च कमी होईल. व महापालिकेतील कामामध्ये पारदर्शकता व सुसुत्रता होण्यास मदत होईल. तसेच मालमत्ता कर वसूली करीता कार्यरत असलेला कर्मचारी मनुष्यबळाचा अपव्यय टाळून सदर कर्मचाऱ्यांना इतर विभागाचे कामकाज सोपवू शकतो. त्यामुळे मालमत्ता कराचा ई–पेमंट व्दारे भरणा केल्याने महापालिकेच्या आर्थिक व्यवहारात पारदर्शकता येणेस मदत होईल.

तरी वरिल आक्षेपांची पुर्तता करून पुर्तता अहवाल त्वरीत लेखापरिक्षण विभागास सादर करावा.

मुख्य लेखा परिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

# नगर रचना विभाग

(परिच्छेद क्र.५१)

**नगर रचना विभागाचे २०१३–१४ ते २०१६–१७ पर्यंतचे लेखापरिक्षण सुरू केले असता खालील अनियमितता दिसून येते.**

**विषयः– जीना, पॅसेज व लॉबी इ. बाबी सवलतीकरीता आकारणी कमी केलेबाबत.**

उल्हासनगर महानगरपालिका महासभा ठराव क्र. ९१ दि. १०/०३/२०१० अनवये इमारत बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने रहिवास व वाणिज्य प्रयोजनार्थ जीना, लॉबी, पॅसेज इ. बाबींच्या सवलतीकरीता शासनाच्या मुद्राक विभागाने वेळोवेळी जमिनीचे ठरविलेले प्रचलीत बाजार दराच्या १५० टक्के(रहिवास प्रयोजनार्थ) व २५० टक्के(वाणिज्य प्रयाजनार्थ) अधिमुल्य शुल्क आकारणेचा ठराव मंजूर करण्यात आलेला आहे.

उल्हासनगर महानगरपालिका नगर रचना विभागाकडून देण्यात आलेल्या इमारत बांधकाम परवानगीच्या काही प्रकरणांची तपासणी केली असता आकारणी कमी केल्याने एकूण रू. ३,५०,६९१/– इतकी रक्कम कमी आकारण्यात आल्याचे निर्दशनास येते.

# नगर रचना विभाग

(परिच्छेद क्र.५२)

**नगर रचना विभागाचे सन २०१३–१४ ते २०१६–१७ पर्यंतचे लेखापरिक्षण सुरू केले असता खालील अनियमितता दिसून येते.**

**विषयः– इमारत बांधकाम विकास शुल्काची कमी आकारणी केलेबाबत.**

नियोजन व नगररचना(सुधारणा) अधिनियम २०१०ची अधिसूचना दि. २७/१२/२०१० व नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई अधिसूचना क्र.टीपीएस – १८१०/५५ प्र.क्र. २११८/१०/ निवि–१३ दि. ०१/०३/२०११ नूसार इमारत बांधकाम विकास कर रहिवास क्षेत्राकरीता रेडीरेकनरमधील जमीन मुल्याच्या २टक्के व वाणिज्य वापरासाठी चार आकारणेबाबत शासन आदेश आहेत.

नगररचना विभागातील मंजूर बांधकाम परवानगीचे निवडक प्रकरणे तपासली असता काही तपासणी केलेल्या प्रकरणांत बांधकाम परवानगी मंजूर करतांना इमारत बांधकाम विकास शुल्काची रक्कम रू. ११११७८/– इतकी कमी वसूली केली असल्याचे निर्दशनास आले आहे.

# नगर रचना विभाग

(परिच्छेद क्र.५३)

**नगररचना विभागाचे सन २०१३–१४ ते सन १६–१७ पर्यंतचे लेखापरिक्षण केले असता खालील अनियमितता दिसून आली**

**विषयः—नगररचना विभागाने बांधकाम लाईन आउट व जोता चेकींगसाठीची फी/शुल्क आकारणी केली नसलेबाबत.**

उल्हासनगर महानगरपालिका नगर रचना कार्यालयाचे २०१४–१५ मधील बांधकाम परवानगी नस्तीचे लेखा परीक्षण केले असता, उल्हासनगर महानगरपालिका मा.महासभा ठराव क्र.९१ दि. १०/०३/२०१० अन्वये बांधकाम लाईन आउट व जोता चेकींगसाठीची फी दर २०० चौ.मी साठी रू.७,५००/— व २०० चौ.मी पेक्षा जास्त बांधकामासाठी रू.१०,०००/— अशा प्रत्येक बांधकामासाठी लाईन आउट व जोता चेकींग फीचे दर घेणेसाठी ठराव केलेला आहे. तसेच उल्हासनगर महानगरपालिका बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र मधील अट क्र.७ जोत्या पर्यंत बांधकाम झाल्यानंतर वास्तु विशारदने दाखल्यासह मंजूर नकाशा प्रमाणे बांधकाम पूर्ण केल्याबाबतचे प्रमाणपत्र महानगरपालिकेस सादर करण्यात येते यानंतर प्रत्यक्ष जागेवर तपासणी करून महानगरपालिकेचा दाखला प्राप्त करून घेऊन नंतरच जोत्यावरील बांधकाम करावे असे नमूद आहे.

तरी २०१४–१५ मध्ये नगररचना विभागाने ५४ बांधकामांना बांधकाम परवानगी दिली आहे. त्यानुसार सदरील बांधकाम परवानगीचे किती बांधकाम जोत्यावर झाले आहे. तसे प्रत्यक्ष जागेवर पाहणी करून बांधकामधारक/वास्तु विशारद यांनी महानगरपालिकेकडून दाखले प्राप्त करून घेतले नाही. त्यामुळे २०१४–१५ मधील ५४ बांधकामा पैकी

किती बांधकामांना जोता प्रमाणपत्र दिले आहे याबाबत खात्री झाली नाही.

# नगररचना विभाग

(परिच्छेद क्र.५४)

**नगररचना विभागाचे सन २०१३–१४ ते सन १६–१७ पर्यंतचे लेखापरिक्षण केले असता खालील अनियमितता दिसून आली**

**विषयः—नगररचना विभागातील जमा होणाऱ्या रक्कमेच्या अनुषंगाने अनियमिततेबाबत.**

नगररचना विभाग, उल्हासनगर महानगरपालिका विभागांतर्गत नविन इमारत बांधकामास मंजूरी देण्यात येते. मंजूरीच्या अनुषंगाने विकासकाकडून मंजूरी विकास शुल्क, निवासी/वाणिज्य इमारतीकरीता विकास शुल्क, उपकर, स्थानिक संस्था कर, जीना/लिफ्ट अधिमुल्य शुल्क इत्यादीच्या अनुषंगाने रक्कम आकारण्यात/जमा करण्यात येतात. याबाबतचे लेखे तपासले असता निदर्शनास आलेल्या आक्षेपांच्या अनुषंगाने खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

१)नगररचना विभागातील पावती पुस्तक साठा नोंदवही लेखापरीक्षणाकरिता उपलब्ध न झाल्याने किती पावती पुस्तके भांडार विभागाकडून प्राप्त झाली, किती पावती पुस्तकांचा वापर करण्यात आला व किती पावती पुस्तके शिल्लक आहेत याबाबत पडताळणी करता आली नाही.

२)उल्हासनगर मनपा ठराव क्र.२६ दि.०९/०७/२०१२ अन्वये अभियंता/पर्यवेक्षक परवाना रू.१०,०००/– इतके शुल्क आकारून देण्यात येतो. तसेच सदर परवान्याचे नुतनीकरण रक्कम रू.१०,०००/– आकारून करण्यात येते. उल्हासनगर मनपा अंतर्गत नोंदणीकृत एकूण किती वास्तुशिल्पकार/स्थापत्य अभियंता आहेत त्यांनी परवान्याचे

नुतनीकरण केले किंवा कसे तसेच नुतनीकरण केले नसल्यास नुतनीकरणापोटी एकूण किती रक्कम वसुलपात्र आहे याबाबत स्पष्टता नाही.

# नगररचना विभाग

(परिच्छेद क्र.५५)

**नगररचना विभागाचे सन २०१३–१४ ते सन १६–१७ पर्यंतचे लेखापरिक्षण केले असता खालील अनियमितता दिसून आली**

**विषयः—बांधकाम परवानगी मंजूरी देताना स्टॅकिंग शुल्क,जिना व लिफ्ट क्षेत्रफळ शुल्क, जमीन विकास अधिकार शुल्क, रहिवाशी अधिभार शुल्क, उपकर शुल्क, प्रतिपूर्ती ठेव शुल्क व जोता प्रमाण पत्र शुल्क यांची आकारणी कमी केले बाबत**

नगररचना विभागातील २०१४–१५ मध्ये निवडक बांधकम परवनगी नस्तीचे लेखा परीक्षण केले असता, नगररचना (सुधारणा)अधिनियम २०१० चे अधिसूचना दि.२७/१२/२०१० व नगरविकास विभाग, मंत्रालय मुंबई यांची अधिसूचना क्र. टीपीएस–१८१०/८५/प्र.क्र.२११८/१०/नवि–१३ दि.०१/०३/२०११ नुसार इमारत बांधकाम विकास कर रहिवाशी क्षेत्रासाठी रेडीरेकनर मधील जमिन मुल्यांच्या २% , वाणिज्य वापरासाठी ४% ,जमिन विकास कर रहिवासी वापरासाठी ०.५% व वाणिज्य वापरासाठी १% इमारत बांधकाम विकास आकारणे बाबत शासन आदेश आहे. तसेच प्रतिपूर्ती ठेव आकारणीसाठी महासभा ठराव क्र. ५७ दि.०६/०३/२०१६ नुसार रू. १०,०००/– प्रतिपूर्ती ठेव घेणे आवश्यक असताना तसे पालन झाले नाही, तसेच इमारत बांधकाम विकास कर व जमिन विकास कर आकारणीची रक्कम कमी वसुल केली आहे. तसेच उल्हासनगर महानगरपालिकाचे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्राच्या अट क्र.७ मधील जोता पर्यंत बांधकाम झाल्यानंतर वास्तु विशारदने दाखल्यासह मंजूर नकाशा प्रमाणे बांधकाम केल्याबाबतचे प्रमाणपत्र, महानगरपालिकेस सादर

करण्यात यावे त्यानंतर प्रत्यक्ष जागेवर तपासणी करून महानगरपालिकेचा दाखला प्राप्त करून घेऊन नंतर जोत्यावरील बांधकाम करावे असे आहे. त्याची जोताप्रमाणपत्र फी घेणेसाठी अट असताना सदर अटीची अंमलबजावणी झालेली दिसून आलेली नाही. तसेच उल्हासनगर महानगरपालिका मा.महासभा ठराव क्र.१३ दि.२८/०६/१९९५ अन्वये बांधकाम परवानगी देण्याबाबत विकासककाकडून घ्यावयाच्या शुल्काबाबत सुधारणा करणे आवश्यक आहे.

# नगररचना विभाग

(परिच्छेद क्र.५६)

**नगररचना विभागाचे सन २०१३–१४ ते सन १६–१७ पर्यंतचे लेखापरिक्षण केले असता खालील अनियमितता दिसून आली**

**विषय:–इमारत बांधकाम प्रतिभुती ठेवीची कमी आकारणी केलेबाबत.**

उल्हासनगर मनपा ठराव क्र.४२ दि.०२/१२/२००८ अन्वये तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र भाग दोन १२ ते १८ नोव्हेंबर २००९ नुसार प्रसिध्द केलेनुसार महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २६ (१) अन्वये प्रतिपूर्ती ठेव आकारणी रक्कम रू.२०/– प्रती चौ.मी. किंवा कमीत कमी रक्कम रू.१०००/– आकारणे आवश्यक असल्याचे नमूद आहे. उदाहरणा दाखल खालील प्रमाणे प्रकरणात कमी प्रतिपूर्ती ठेवीची रक्कम जमा केल्याचे निदर्शनास आले आहे. उर्वरीत रक्कम रू.२५०००/– वसुल करणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | विकासकाचे नाव | पावती क्र. | जमा प्रतीपुर्ती ठेवीची रक्कम रूपये | जमा होणे आवश्यक प्रतीपुर्ती ठेवीची रक्कम रूपये | फरकाची वसुलपात्र रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.मनोहर मुलचंदानी | २८/१४/३५४ दि. १६/०३/१५ | ५०००/– | १००००/– | ५०००/– |
| २ | श्री.दिनेश रूपानी | २९/१४/३३९ दि. १२/०३/१५ | ५०००/– | १००००/– | ५०००/– |
| ३ | श्री.गुलाब लल्ला | ०७/१३/३५९ दि. २५/०३/१५ | ५०००/– | १००००/– | ५०००/– |
| ४ | श्री.भारत हसवानी | ७९/१३/३५८ दि. २५/०३/१५ | ५०००/– | १००००/– | ५०००/– |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | श्री.गंगाराम पवार | १८/१४/३३५ दि. १०/०३/१५ | ५०००/— | १००००/— | ५०००/— |
| | | | | एकूण वसुलपात्र रक्कम रूपये | २५०००/— |

# नगररचना विभाग

(परिच्छेद क्र.५७)

**नगररचना विभागाचे सन २०१३–१४ ते सन १६–१७ पर्यंतचे लेखापरिक्षण केले असता खालील अनियमितता दिसून आली.**

**विषयः—इमारत बांधकाम विकास शुल्काची कमी आकारणी केलेबाबत.**

नियोजन व नगररचना (सुधारणा) अधिनियम २०१० ची अधिसूचना दि.२७/१२/२०१० व नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई अधिसूचना क्र. टीपीसीएस – २११८ / १० /नवि–१३ दि.०१/०३/२०११ नूसार इमारत बांधकाम विकास कर रहिवास क्षेत्राकरिता रेडीरेकनरमधील जमीन मुल्याच्या दोन टक्के व वाणिज्य वापरासाठी चार टक्के आकारणेबाबत शासन आदेश आहेत.

नगररचना विभागातील मंजूर बांधकाम परवानगीचे निवडक प्रकरणे तपासली असता काही निवडक तपासणी केलेल्या प्रकरणांत बांधकाम परवानगी मंजूर करताना इमारत बांधकाम विकास शुल्काची रक्कम रू. २६९३४०/– इतकी कमी वसूल केली असल्याचे निदर्शनास आले आहे.

# नगररचना विभाग

(परिच्छेद क्र.५८)

**नगररचना विभागाचे सन २०१३–१४ ते सन १६–१७ पर्यंतचे लेखापरिक्षण केले असता खालील अनियमितता दिसून आली**

**विषयः–नगररचना विभागाने बांधकाम पूर्णत्वाचा/भोगवटा.**

प्रमाणपत्रबाबत फी शुल्क आकारणी केली नसलेबाबत. उल्हासनगर महानगरपालिका नगररचना विभागाचे/लेखापरिक्षण केले असता महासभा ठराव क्र.९१ दि.१०/०३/२०१० अन्वये इमारत बांधकाम वापर परवाना (२०० चौरस मीटर पर्यंत रू.७,५००/– व २०० चौरस मीटरपेक्षा जास्त रू.१०,०००/–) अशा प्रत्येक बांधकाम पूर्णत्वाचा/भोगवटा दाखला शुल्क घेणेसाठी ठराव केलेला आहे.

उल्हासनगर महानगरपालिका नगररचना विभागाने बांधकाम प्रारंभ देतांना सदरील, प्रमाणपत्रात बांधकामधारकांना ज्या अटी दर्शविलेल्या आहेत, तरी नगररचना विभागाने २०१३–१४ मध्ये बांधकाम पूर्ण झालेबाबत प्रकरणे निरंक आहे असे सांगितले आहे. व २०१४–१५ मध्ये एकूण ८ बांधकाम पूर्ण झालेबाबतचे विवरणपत्रात कळविले आहे.

नगररचना ज्या बांधकामांना भागेवटा दाखला दिला त्या नस्ती लेखा परीक्षणास दाखविण्यात आलेल्या नसल्याने शहरामधील २०१३–१४ व २०१४–१५ मध्ये बांधकामपूर्णत्वाचा/भोगवटा बाबतचा अटी याबाबतची खात्री झालेली नाही.

# नगररचना विभाग

(परिच्छेद क्र.५९)

**नगररचना विभागाचे सन २०१३–१४ ते सन १६–१७ पर्यंतचे लेखापरिक्षण केले असता खालील अनियमितता दिसून आली**

**विषयः—नगररचना विभागातील सर्वसाधारण अनियमितता.**

१) श्री. आनंद भाटीया, बांधकाम परवानगी क्र.१/१३/२०७ दि. १४/०६/२०१३ च्या अनुषंगाने जोता तपासणी मिळणेकरीता अर्ज सादर करण्यात आला असून त्यासोबत सुयोग असोशिएशन यांनी जोत्यापर्यंत काम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र सादर केले आहे. परंतू त्या प्रमाणपत्रावर दिनांक नमूद नसल्याने सदर काम जोत्यापर्यंत कधी पूर्ण झाले याबाबत पडताळणी करता आली नाही. तसेच जोता पूर्णत्वाचा दाखला दिला असून त्याच्या शुल्काची रक्कम रू.५०००/— विकासकाकडून घेतली नसल्याने सदर रक्कम वसुलपात्र आहे. स्थापत्य अभियंता यांनी दि.१६/३/२०१३ रोजी स्टॅबिलिटी प्रमाणपत्र सादर केले आहे. परंतू सदर प्रमाणपत्रावर स्थापत्य अभियंता यांचे नाव, कार्यालयाचा पत्ता व परवाना क्रमांक नमूद नाही. विकासकाने बांधकाम परवानगी मिळणेचे अर्जात निवासी वापराकरिता इमारतीचा विकास करण्यात येत असल्याचे नमूद असतांना आदित्य कॉम्प्युटर सर्व्हीसेस यांनी त्यांच्या दि.२८/०३/२०१३ च्या संगणकीय अहवालात निवासी व वाणिज्य असे दोन्ही वापर दर्शविले आहे. तसेच आदित्य कॉम्प्युटर सर्व्हीसेस यांचे अहवालात नमूद इमारत बांधण्याचे क्षेत्रफळ, त्यांचे वापर व सामाजिक अंतरात सूट, जीना/लिफ्ट/पॅसेज यांचे क्षेत्रफळ व विकासकाने सादर केलेले सदर बाबींचे क्षेत्रफळ यांत तफावत आहे.

२) उल्हासनगर महानगरपालिका विकास नियंत्रण नियमावली मधील नियम क्र.४.२२.१ नूसार विकासकाने विहीत नमून्यात व संबंधित कागदपत्रांसोबत बांधकाम परवानगीसाठी अर्ज सादर केल्यानंतर संबंधित प्राधिकारी यांनी ६० दिवसांत बांधकामास परवानगीस मंजूरी/ना—मंजूरी (कारणासहित) देणे अपेक्षित आहे. श्री.प्रकाश माखीजानी, बांधकाम परवानगी क्र.२१/१३/४०८ दि.०७/१०/२०१५ यांनी दि. ३०/०४/२०१३ रोजी अर्ज सादर केला असतांना बांधकाम परवानगी दि.०७/१०/२०१५ रोजी विलंबाने दिली आहे. विलंबाने कोणतेही कारण निदर्शनास आले नाही. तसेच बांधकाम परवानगीच्या प्रकरणात जोता तपासणी दाखल्याचे शुल्क रक्कम रू.५०००/— घेतलेबाबत अभिलेख नस्तीत नसल्याने शुल्क आकारल्याची पडताळणी करता आली नाही.

**मुख्य लेखा परिक्षक**
**उल्हासनगर महानगरपालिका**

# पाणी पुरवठा विभाग

(परिच्छेद क्र.६०)

पाणी पुरवठा विभागाचे सन २०१३—१४ ते २०१६—१७ पर्यंतचे लेखापरिक्षण सुरू केले असता खालील अनियमितता दिसून येते.

**विषयः— पाणीपुरवठा विभागातील वसुली निरीक्षक यांनी जमा केलेल्या पाणी पुरवठयाच्या रकमां बाबत.**

उल्हासनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागातील वसुली निरीक्षक यांनी त्यांच्याकडे जमा होणाऱ्या रकमांबाबतचे लेखा परीक्षण केले असता पाणीपुरवठा विभागातील वसुली निरीक्षक यांनी जमा केलेल्या पाणी पुरवठयाच्या रकमांबाबत पावती पुस्तकातील पावत्यासंबंधी चलने लेखा परीक्षणास उपलब्ध झाली नाहीत.

| अ.क्र. | पावती पुस्तक क्रमांक | पावती क्रमांक | रक्कम रूपये |
|---|---|---|---|
| ०१ | ११८ | ५८५१ ते ५९९० दि. २२/०५/२०१३ | १५७०९८८/— |
| ०२ | ११९ | ५९३० दि. २२/०७/२०१३ | ४३८७५/— |
| ०३ | | ५९३१ ते ५९३३ | ८२७३२/— |
| ०४ | | ५९३४ दि. ०२/०८/२०१३ | ९२०३३/— |
| ०५ | | ५९४० ते ५९४१ दि. ०२/०८/२०१३ | ८८०५/—१६०१/— |
| ०६ | १२२ | ६०६३ दि. २५/०७/२०१३ | ९८७६/— |
| ०७ | १२६ | ६२८७,६२८८,६२९७ दि. ३०/०७/२०१३ | ५४२६/— १४०००/ २५००/ |
| ०८ | १२७ | ६३१४,६३१६,६३१७ दि. ०१/०८/२०१३ | ६०६०/—४९६२/ ६३१७/— |

१. चलन क्र. १८६९ दि. ०३/०८/२०१३ ची रक्कम रू. २८७६९०/—

२. चलन क्र. २२५८ दि. २८/०९/२०१३ ची रक्कम रू. ६०८२७९/—

३. चलन क्र. २३३३ दि. ०३/१०/२०१३ ची रक्कम रू. १४२२०६२—

तसेच सन २०१३—१४ मधील वर नमूद केलेल्या चलनांची रक्कम कोणत्या बॅकेत जमा केली याची व त्या बॅकेचे विवरणपत्र लेखा परिक्षणास उपलब्ध झाले नाही.

## पाणी पुरवठा विभाग

(परिच्छेद क्र.६१)

**पाणी पुरवठा विभागाचे सन २०१३–१४ ते २०१६–१७ पर्यंतचे लेखापरिक्षण सुरू केले असता खालील अनियमितता दिसून येते.**

**विषयः—उल्हासनगर मनपांतर्गत विविध बुस्टरपंपिंग स्टेशन येथे कंत्राटदारामार्फत अतिरिक्त पंपचालक पुरविणेसाठी केलेल्या खर्चातील अनियमिततांबाबत.**

माहे ऑगस्ट २००९ मध्ये नव्याने उभारण्यात आलेल्या १) मेनका बुस्टर पंपींग स्टेशन, २) काजल पेट्रोल बुस्टर ३) सपना गार्डन बुस्टर, ०४) गांधीनगर बुस्टर पंपींग स्टेशन या ०४ बुस्टर पंपींग स्टेशन चालविणेसाठी अतिरिक्त पंपचालक व मदतनीस पुरवठा करण्याच्या कामासाठी होणाऱ्या खर्चाच्या प्रशासकीय मान्यतेची नस्ती उपलब्धप नसल्याने मा. आयुक्तांच्या मान्यतेने मे. कल्पतरू इंजिनिअर्स यांना कार्यादेश देण्यात आल्याबाबत तसेच महाराष्ट्र प्रांतीक महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा. आयुक्त यांची मान्यता घेण्यात आल्याचे आढळून आले नाही.

२) पुरवठादाराने अतिरिक्त पंपचालक पुरवठा केल्याबाबत कामाच्या कालावधीत उपस्थित पंपचालकांचे हजेरीपत्रके, उपस्थिती अहवाल प्रमाणकासोबत उपलब्ध झाले नाहीत. तसेच सदर कामासाठी कंत्राटदाराशी केलेला करारनामा लेखा परिक्षणास पडताळणीसाठी उपलब्ध झाला नाही. त्यामुळे सदर कामाच्या सत्यतेबाबत लेखा परिक्षणास खात्री झाली नाही.

३) महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील परिशिष्ट 'ड' प्रकरण ५ मधील कलम ०२ नुसार रू. ५०,०००/– किंवा त्यावरील

खर्चासाठी जाहीर निविदा मागविणे आवश्यक आहे. परंतू नव्याने उभारण्यात आलेल्या बुस्टर पंपींग स्टेशनसाठी अतिरिक्त पंपचालक व मदतनीस पुरवठा करण्यासाठी जाहिर निविदा न मागविता तत्कालीन कार्यरत कंत्राटदाराकडून सदर काम करून घेण्यात आले असून त्यासाठी रू.७,६०,६४२/- एवढा खर्च करण्यात आला आहे.

४) दि.१८/०८/२००९ ते दि. १४/०२/२०११ या कालावधीत अतिरिक्त पंपचालक व मदतनीस पुरवठा करण्यासाठी केलेल्या खर्चाचे प्रदान अतिरिक्त आयुक्त यांचया दि.३१/१०/२०११ रोजीच्या मान्यतेने वर्ष २०१३-१४ साठी व पाणी खाते १३ बुस्टर मशीनरी चालवणे खर्च या लेखाशिर्षखाली मंजूर अर्थसंकल्पीय तरतूदीतून करण्यात आला आहे. यासाठी महाराष्ट्र प्रांतीक महानगरपालिका अधिनियमातील कलम १०२ नुसार स्थायी समितीची मान्यता घेण्यात आल्याचे लेखा परिक्षणास आढळून आले नाही.

५) सदर कामासाठी दि. १८/०८/२००९ ते १४/०९/२०११ या कालावधीत पुरवठा केलेल्या अतिरिक्त पंपचालक व मदतनीस यांच्या नोंदी सदर कामाची मोजमाप नोंदवही क्र.१५६ व १७२ मध्ये नोंदविण्यात आल्याचे लेखा विभागाकडे प्रदानार्थ सादर केलल्या प्रमाणकावर नमूद करण्यात आले आहे. सदर मोजमाप नोंदवहया लेखा परिक्षणास उपलब्ध झाल्या नाहीत.

६) कंत्राटदाराने पुवठा कलेल्या अतिरिक्त पंपचालक व मदतनीस यांना सदर कालावधीत किमान वेतन कायदयाप्रामाणे वेतनाचे प्रदान केल्याबाबतचे अभिलेख प्रमाणकासोबत उपलब्ध झाले नाहीत.

# पाणी पुरवठा विभाग

(परिच्छेद क्र.६२)

**पाणी पुरवठा विभागाचे सन २०१३–१४ ते २०१६–१७ पर्यंतचे लेखापरिक्षण सुरू केले असता खालील अनियमितता दिसून येते.**

**विषयः–पाणी पुरवठा विभागातील जमेचे लेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करून न देणेबाबत.** दिल्याबाबत

राष्ट्रीय लेखा संहिता २००४ मधील नियम क्र.९.३ मध्ये पाणी पुरवठा कर आकारणी बाबतची तरतुद विषद केली आहे. उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात पाणी कर आकारणी बाबत कोणती पध्दत अवलंबली जाते तसेच २०१३–१४ व २०१४–१५ मधील पाणी पुरवठा विषयक एकुण जमेची सांख्यिकी माहिती खालील मुद्दे विचारात घेउन लेखा परीक्षणास सादर करणेबाबत विचारणा करण्यात आली होती तथापि लेखे उपलब्ध करून न दिल्याने पुढील लेखे लेखापरिक्षणास उपलब्ध न केलेची अनियमितता कायम करण्यात येत आहे.

१. पाणी कर

२. मलनिंसारण कर

३. पाणीपुरवठा मुल्य

४. मलनिंसारण मुल्य

५. पाणी पुरवठा मिटर भाडे

६. पाणी पुरवठा नवीन जोडणी मुल्य

७. पाणी पुरवठा टॅंकर मुल्य

८. रस्ता दुरूस्ती भरपाई मुल्य

९. नोटीस फी

१०. वारंटी फी

११. दंडात्मक रक्कम

१२.थकीत रक्कम

१३.बुडीत रक्कम

वरील बाबी विचारत घेउन २०१३–१४ व २०१४–१५ मधील पाणी पुरवठा विषयक जमा नोंदवहया व जमा रोखवहया तसेच जमेची बॅक विवरणे लेखा परिक्षणास उपलब्ध करून दिलेली नाही.

# पाणी पुरवठा विभाग

(परिच्छेद क्र.६३)

पाणी पुरवठा विभागाचे सन २०१३–१४ ते २०१६–१७ पर्यंतचे लेखापरिक्षण सुरू केले असता खालील अनियमितता दिसून येते.

कार्यादेशः—क्र.युएमसी/डब्ल्यू.एस.एस.डी/ई.ई/२६/दि. ०३/०१/२०१४

ठेकेदाराचेनावः— मे. हर्षल टेक्निमक, नासिक

**विषयः—उल्हासनगर मनपाच्या अंतर्गत कॅम्प क्र.१ ते ३ मध्ये असलेले विविध बुस्टर पंपिंग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरूस्ती कामातील अनियमितता**

सदर कामाचे अंदाजपत्रक, निविदा व खर्चाची प्रमाणके व मोजमाप पुस्तकातील नोंदीची तपासणी केली असता लेखापरिक्षणास आढळुन आलेल्या अनियमिततातंबाबत लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात आले आहे.

१) सदर कामासाठी स्थायी समिती ठराव क्र. ५६ दि. २३/१०/२०१३ अनवये दिलेल्या मान्यतनुसार मे. हर्षल टेक्निक, नाशिक यांना कार्यादेश क्र.यु.एम.सी/डब्यू.एस.डी/सी.ई२मेक/१७७ दि. २९.०१.२०१३ अन्वये कामाची मुदत कर्यादेशापासून १२ महिन्यासाठी म्हणजेच दि. २८/०१/२०१४ पर्यंत देण्यात होती. निविदेचा कार्यकाल दि. २८/०१/२०१४ रोजी संपत असल्यामुळे तसेच २ ते ३ महिन्यात जे.एन.यु.आर.एम. योजना कार्यान्वीत होणार असल्याने तसेच बरेच पंपींप स्टेशन बंद होण्याची शक्यता असल्याने नव्याने निविदा न मागविता मे. हर्षल टेक्नीक, नाशिक यांना मुदतवाढ देण्यास आयुक्तांनी जुन–२०१४ अखेर निविदा मागविण्याच्या अधीन

राहून दि २८/०२/२०१४ रोजी मान्यता दिली असून कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र.८३९ दि. ०६.०६.२०१४ नुसार ठेकेदारास पुढील आदेश होईपर्यंत मुदतवाढ देणेत आली आहे. तथापि सदर मुदतवाढीस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ नुसार स्थायी समितीची मान्यता घेणेत आली नाही.

२) पुरवठा केलेल्या कामगारांचे हजेरीपत्रके/उपस्थिती अहवाल नस्तीत अथवा प्रमाणकांसोबत आढळून आले नाहीत. त्यामुळे कंत्राटदाराने प्रत्यक्षात किती कामगार पुरवठा केले व त्यापैकी किती कामगार प्रत्यक्ष कामावर हजर होते यांची पडताळणी करता आली नाही. कंत्राटदारास वेतनाच्या रकमेचे प्रदान करतांना प्रत्यक्षात पुरवठा केलेल्या कामगारांच्या हजेरीची पडताळणी न करता कामगाराच्या वेतनाची रक्कम कंत्राटदारास अदा करण्यात आली आहे.

# पाणी पुरवठा विभाग

(परिच्छेद क्र.६४)

पाणी पुरवठा विभागाचे सन २०१३–१४ ते २०१६–१७ पर्यंतचे लेखापरिक्षण सुरू केले असता खालील अनियमितता दिसून येते.

कार्यादेश:–क्र.युएमसी/डब्ल्यू.एस.एस.डी/सी.ई/मेका/१७६/

दि.२९/०१/२०१३

ठेकेदाराचेनाव:– **मे. हर्षल टेक्निमक, नासिक**

**विषय:–उल्हासनगर मनपाच्या कॅम्प क्र.४ ते ५ मध्ये असलेले टप्पा क्र.१ अंतर्गत एच.टी.पंपिंग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरूस्ती कामातील अनियमितता**

सदर कामाचे अंदाजपत्रक, निविदा व खर्चाची प्रमाणके व मोजमाप पुस्तकातील नोंदीची तपासणी केली असता लेखापरिक्षणास आढळुन आलेल्या अनियमिततातंबाबत लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात आले आहे.

१) सदर कामासाठी एच.टी.पंपिंग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरूस्ती या प्रस्तावित कामाचे स्वरूप विचारात घेता खर्चाचे अंदाजपत्रक तयार करतांना त्यात माळी/गार्डनर १, टायपिस्ट कम कम्पुटर ऑपरेटर १ ही दोन पदे समाविष्ट करण्याचे प्रयोजन नस्तीतील उपलब्ध अभिलेख्यावरून स्पष्ट झाले नाही. त्यामुळे सदर पदांच्या वेतनाचा खर्च अंदाजपत्रकात समाविष्ट करण्याच्या आवश्यकतेबाबात खात्री झाली नाही.

२) ठेकेदाराकडून सुरक्षा अनामत रक्कम म्हणून दि. २७.०७.२०१४ पर्यंत मुदत असलेली रू.२,४०,५००/– एवढया रकमेची एफ.

डी.आर.घेण्यात आली तथापि ठेकेदारास मुदतवाढ देतांना सदर एफ.डी. आर.ची मुदत कंत्राट कालावधीत वाढवून घेणेत आली नाही.

३)पुरवठा केलेल्या कामगारांचे हजेरीपत्रके/उपस्थिती अहवाल नस्तीत अथवा प्रमाणकांसोबत आढळून आले नाहीत. त्यामुळे विभागाकडून कंत्राटदारास कामगारांच्या वेतनाच्या रकमेचे प्रदान करतांना कंत्राटदाराने प्रत्यक्षात किती कामगार पुरवठा केले व त्यापैकी किती कामगार प्रत्यक्ष कामावर हजर होते यांची पडताळणी न करता कामगारांच्या वेतनाची रक्कम कंत्राटदारास अदा करण्यात आली आहे. त्यामुळे कामगारांच्या वेतनासाठी प्रदान केलेल्या रकमेच्या अनुज्ञेयतेबाबत लेखा परिक्षणास खात्री झाली नाही.

# पाणी पुरवठा विभाग

(परिच्छेद क्र.६५)

**पाणी पुरवठा विभागाचे सन २०१३–१४ ते २०१६–१७ पर्यंतचे** लेखापरिक्षण **सुरू केले असता खालील अनियमितता दिसून येते.**

**कार्यादेश:— क्र.युएमसी/डब्ल्यू.एस.एस.डी/सी.ई/मेका/१५६१/दि. ०२/१२/२०१३(अंदाजपत्रकीय दर)**

ठेकेदाराचेनाव:— **मे. गीतांजली मजूर कामगार सहकारी संस्था**

**विषय:—** उल्हासनगर मनपांतर्गते कॅम्प १ ते ३ मधील अस्तित्वातील विंधण विहीरीवरील हातपंपाचे वार्षीक देखभाल व दुरूस्ती करणे कामातील अनियमिततांबाबत.

उल्हासनगर मनपाच्या अंतर्गत कॅम्प १ ते २ मधील अस्तित्वातील विंधण विहीरीवरील हातपंपाचे दि. ०१/०४/२०१४ ते ३१/०३/२०१४ देखभाल व दुरूस्तीचे काम मजुर सहकारी संस्थेकडून करून घेण्यात आले त्या कामातील पुस्तकातील नोंदीची तपासणी केली असता लेखापरिक्षणास आढळुन आलेल्या अनियमितताबाबत लेखापरिक्षणात खालील प्रमाणे अभिप्राय नोंदविण्यात येत आहे.

१) मनपाच्या कॅम्प १ ते ३ मधील एकूण बोअरवेलची संख्या, कार्यरत बोअरवेल व बंद पडलेली बोअरवेल याबाबतचा तपशील मालमत्ता नोंदवहीतील नोंदीसह पडताळणी उपलब्ध झाला नाही. त्यामुळे विभागांतर्गत एकूण बोअरवेलची संख्या, कार्यरत बोअरवेल व बंद पडलेल्या बोअरवेल यांची लेखा परिक्षणास पडताळणी करता आली नाही.

२) उल्हासनगर मनपा अंतर्गत कॅम्प १ ते ३ मधील एकूण ३५० बोअरवेल देखभाल दुरूस्तीसाठी रू. ६,१६,०५५/— एवढया खर्चाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर बोअरवेल्सची यादी अंदाजपत्रकासोबत उपलब्ध नाही. अंदाजपत्रकात समाविष्ट केलेल्या ३५०

बोअरवेलच्या मालमत्ता नोंदवहीतील नोंदी तसेच सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करणाऱ्या अधिकाऱ्याचा स्थळ पाहणी अहवाल पडताळणीस उपलब्ध झाला नसल्याने अंदाजपत्रकात समाविष्ट खर्चाची पडताळणी करता आली नाही.

३) मालमत्ता नोंदवहीतील नोंदीनुसार कॅम्प १ते ३ मध्ये अस्तित्वात असलेली बोअरवेल व चालू वा बंद स्थितीत असलेली बोअरवेलच्या देखभाल दुरूस्तीचे अंदाजपत्रक तयार करून कंत्राटदाराने कोणत्या बोअरवेलच्या दुरूस्तीची कामे करावयाची आहेत त्याबाबी नमूद करून कंत्राटदारास कामाचे आदेश न देता एकूण ३५० बोअरवेलच्या देखभाल दुरूस्ती खर्चाची अंदाजपत्रकीय रक्कम नमुद करून कामाचे आदेश देण्यात आले. त्यामुळे कंत्राटदारास कोणत्या बोअरवेलच्या दुरूस्तीची कामे देण्यात आली याची लेखापरिक्षणास खात्री करता आली नाही.

४) सदर कामासाठी दरवर्षी कंत्राटदार नियुक्त करून बोअरवेल देखभाल दुरूस्तीची कामे करण्यात येतात. कंत्राटदाराशी करारनामा करतांना त्यात बोअरवेल दुरूस्तीचा दोष दायित्व कालावधी विहीत करण्यात आला नसल्याने पुन्हा पुन्हा त्याच बोअरवेलच्या दुरूस्तीसाठी खर्च करावा लागल्याची शक्यता नाकारता येत नाही. पहिल्या धावत्या देयकांन्वये कंत्राटदार संस्थेस १७५ बोअरवेलच्या देखभाल दुरूस्तीच्या कामासाठी एकुण रू. ३,१६,७७१/– एवढया रकमेपैकी प्रमाणक क्र. ५३६५ दि.०४/०३/२०१४ अन्वये रू. २,७१,६३०/– एवढया निव्वळ रकमेचे प्रदान करण्यात आले आहे. सदर देयकाची पडताळणी करता कंत्राटदाराने दुरूस्त केलेल्या १७५ बोअरवेलची यादी व हिस्ट्रीशिट पडताळणीस उपलब्ध झालया नाहीत.

# पाणी पुरवठा विभाग

(परिच्छेद क्र.६६)

**पाणी पुरवठा विभागाचे सन २०१३–१४ ते २०१६–१७ पर्यंतचे लेखापरिक्षण सुरू केले असता खालील अनियमितता दिसून येते.**

**विषय:–उल्हासनगर मनपांतर्गत कॅम्प ४ ते ५ मधील अस्तित्वातील विंधण विहीरीवरील हातपंपाचे वार्षीक देखभाल व दुरूस्ती करणे कामातील अनियमिततांबाबत.**

सदर कामाचे अंदाजपत्रक, निविदा व खर्चाची प्रमाणके व मोजमाप पुस्तकातील नोंदीची तपासणी केली असता लेखापरिक्षणास आढळुन आलेल्या अनियमिततातंबाबत लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात आले आहे.

कंत्राटदाराचे नाव:– मे. सिंधू भारती मजूर सहकारी संस्था मर्या.

करारनामा:– रू. १००/–

१) मनपाच्या कॅम्प ४ ते ५ मधील एकूण ३२५ बोअरवेलच्या देखभाल दुरूस्तीसाठी रू. ६,४०,११०/– एवढया खर्चाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. परंतू कॅम्प ४ ते ५ मधील एकूण बोअरवेलची संख्या, कार्यरत बोअरवेल व बंद पडलेली बोअरवेल याबाबतचा तपशील मालमत्ता नोंदवहीतील नोंदीसह पडताळणी उपलब्ध झाला नाही. दुरूस्त करावयाच्या बोअरवेलची यादी तसेच सदर कामचे अंदाजपत्रक तयार करणाऱ्या अधिकाऱ्याचा स्थळ पाहणी अहवाल अंदाजपत्रकासोबत पडताळणीस उपलब्ध झाली नाही. त्यामुळे अंदाजपत्रकात समाविष्ट खर्चाची पडताळणी करता आली नाही.

२) मालमत्ता नोंदवहीतील नोंदीनुसार कॅम्प ४ ते ५ मध्ये अस्तित्वात असलेली बोअरवेल व चालू वा बंद स्थितीत असलेली बोअरवेल यांचा

आढावा घेवून त्यानुसार बोअरवेलच्या देखभाल दुरूस्तीचे अंदाजपत्रक तयार करून कंत्राटदाराने कोणत्या बोअरवेलच्या दुरूस्तीची कामे करावयाची आहेत त्याबाबी नमूद करून कंत्राटदारास कामाचे आदेश न देता एकूण ३२५ बोअरवेलच्या देखभाल दुरूस्ती खर्चाची अंदाजपत्रकीय रक्कम नमुद करून कामाचे आदेश देण्यात आले. त्यामुळे कंत्राटदारास कोणत्या बोअरवेलच्या दुरूस्तीची कामे देण्यात आली याची लेखापरिक्षणास खात्री करता आली नाही.

३) पहिल्या धावत्या देयकान्वये कंत्राटदार संस्थेस ८२ बोअरवेलच्या देखभाल दुरूस्तीच्या कामासाठी एकूण रू. ४,०४,३६६/— एवढया रकमेपैकी प्रमाणक क्र. ४८९१ दि. ३०/०३/२०१५ अन्वये रू. ३,४६७४४/— एवढया निव्वळ रकमेचे प्रदान करण्यात आले आहे. सदर देयकाची पडताळणी करता कंत्राटदाराने दुरूस्त केलेल्या ८२ बोअरवेलची यादी व बोअरवेलच्या हिस्ट्रीशिटच्या नोंदी पडताळणीस उपलब्ध झाल्या नाहीत. यावरून मटेरिअल पार्ट या बाबीवरील खर्च व स्क्रॅप मटेरियल यांची पडताळणी न करता कंत्राटदारास देयकाचे प्रदान करण्यात आले आहे.

४) विभागाकडून दरवर्षी कंत्राटदार नियुक्त करून बोअरवेल देखभाल दुरूस्तीची कामे करण्यात येतात. त्यामुळे पुन्हा त्याच बोअरवेलच्या दुरूस्तीसाठी खर्च टाळण्याच्या दृष्टीने कंत्राटदाराशी करारनामा करतांना त्यात दुरूस्त करण्यात येणाऱ्या बोअरवेल दुरूस्तीचा दोष दायित्व कालावधी विहीत करणे आवश्यक होते. परंतू करारनाम्यात बोअरवेलचा दुरूस्तीचा दोष दायित्व कालावधी विहीत करण्यात आला नाही.

मुख्य लेखा परिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका